cmyk

## संपादकीय

### उलटा प्रवास : इंधन दर कमी करण्याऐवजी वाढविले

एलपीजी गॅस सिलिंडरच्या दरात ५० रुपयांची वाढ झाली आहे. प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या लाभार्थींनाही वाढ लागू होणार आहे. सरकारने पेट्रोल-डीझेलच्या उत्पादन शुल्कातही २ रुपयांची वाढ केली आहे. यामुळे तत्काळ प्रभावाने इंधनाच्या किमती वाढल्या नसल्या, तरी सरकारचा जुना अनुभव पाहता ही वाढ होणारच नाही असे कोणी म्हणू शकत नाही. महागाई नेहमीप्रमाणे वाढलेली आहेच, सिलिंडरही महाग केले आहे. मध्यम किंवा सर्वसामान्य वर्गाला हा एक झटकाच आहे व पेट्रोल-डीझेलच्या भविष्यात होणाऱ्या दरवाढीमुळे एक वर्तुळ पूर्ण होणार आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष –४ | अंक–३४५ | गुरूवार, दि.१० एप्रिल २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


### मुंबई उच्च न्यायालयाच्या नवीन इमारतीसाठी २.१५ एकर जमीन सुपूर्द करणार

नवी दिल्लीः वांद्रे येथील मुंबई उच्च न्यायालयाच्या नवीन इमारत संकुलाच्या बांधकामासाठी २.१५ एकर जमीन ३० एप्रिलपर्यंत सुपूर्द केली जाईल, अशी माहिती राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात बुधवारी सादर केली. राज्याचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी न्यायमूर्ती बी. आर. गवई आणि ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठाला सांगितले की, ३१ मार्चपर्यंत ४.०९ एकर जमीन सुपूर्द करायची होती. यापैकी १.९४ एकर जमीन देण्यात आली आहे. उर्वरित २.१५ एकर जमीन एप्रिल महिन्याच्या अखेरपर्यंत सुपूर्द करण्यात येईल. या जमिनीशी संबंधित २० हून अधिक याचिका मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित असल्याची माहितीही सर्वोच्च न्यायालयाला देण्यात आली. या प्रकरणांचा जलद निपटारा करण्यासाठी, सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना सर्व याचिका एकाच खंडपीठासमोर सूचीबद्ध करण्यास सांगितले आहे.

## थोडक्यात...

### भाजपातील दोघांच्या आमदारकी अडचणीत !

मुंबईः नागपूर जिल्ह्यातील भाजपचे दोन आमदार सध्या अडचणीत सापडले आहेत. त्यांच्यावर विधानसभा निवडणुकीत नियमांचे उल्लंघन केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. त्यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाकडून नोटीस बजावण्यात आली आहे. यामुळे त्यांची आमदारकीदेखील जाण्याची शक्यता आहे. हिंगणा मतदारसंघाचे आमदार समीर मेघे आणि काटोल मतदारसंघाचे आमदार चरणसिंह ठाकूर या दोन आमदारांचा यात समावेश आहे. या प्रकरणात न्यायालयाने दोन्ही आमदारांना तीन आठवड्यांच्या आत आपला जबाब सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

### चीनने अमेरिकेवरील टॅरिफ ८४% पर्यंत वाढवला

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नव्याने मोठ्या प्रमाणात आयात शुल्क (टॅरिफ्स) लागू करत जागतिक व्यापार धोरणात मोठे परिवर्तन घडवले आहे. तसेच अमेरिका आणि चीनमधील टॅरिफ वॉर आणखी तीव्र झाले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ९ एप्रिलपासून चीनवरील आयात शुल्क १०४ टक्के वाढवल्यानंतर, चीनने आता १० एप्रिलपासून अमेरिकेतून येणाऱ्या सर्व वस्तूंवर ३४ टक्क्यांऐवजी ८४ टक्के आयात शुल्क लावण्याची घोषणा केली आहे.

### एटीएममधून पैसे काढण्यासाठी एसबीआयकडून नवे नियम

स्टेट बँक ऑफ इंडिया अर्थात एसबीआय त्यांच्या ग्राहकांसाठी सुधारित एटीएम व्यवहार शुल्क आणि मोफत वापर मर्यादा लागू करेल. हे नियम १ फेब्रुवारी २०२५ पासून लागू आहेत. या निर्णयाचा उद्देश शुल्क संरचना सुलभ करणे आणि डिजिटल बँकिंगला प्रोत्साहन देणे आहे, ज्यामुळे एसबीआय आणि इतर बँकांच्या एटीएममधील आर्थिक आणि गैर-आर्थिक व्यवहारांवर परिणाम होईल. एसबीआय ने १ फेब्रुवारी २०२५ पासून बचत खातेधारकांसाठी उपलब्ध असलेल्या मोफत एटीएम व्यवहारांच्या संख्येत बदल केले आहेत. दरमहा एटीएममध्ये ५ मोफत व्यवहार आणि इतर बँकांच्या एटीएममध्ये १० मोफत व्यवहार मिळतील.

# पंतप्रधान कृषी सिंचन योजनेसाठी सोळाशे कोटी

## निधीला केंद्रीय मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता, शेतकऱ्यांच्या पाणी वापर कार्यक्षमतेत सुधारणा

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**केंद्र सरकारने प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेच्या अंतर्गत कमांड एरिया डेव्हलपमेंट अँड वॉटर मॅनेजमेंटच्या आधुनिकीकरणाला मान्यता दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि.९) केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत शेतकऱ्यांच्या पाणी वापर कार्यक्षमतेत सुधारणा घडवून आणण्यासाठी १ हजार ६०० कोटी रुपयांच्या निधीला मंजूरी देण्यात आली आहे.**

या योजनेमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल, तसेच शेतकऱ्यांची उत्पादकता वाढून सिंचनाची व्यवस्था अधिक शाश्वत पद्धतीने अंमलात येईल, असा केंद्र सरकारचा दावा आहे. तसेच योजनेचे पायलट प्रोजेक्ट विविध जिल्ह्यात सुरू करण्यात येणार आहेत. या पायलट प्रोजेक्टनंतर केंद्र सरकार राष्ट्रीय पातळीवर कमांड एरिया डेव्हलपमेंट अँड वॉटर मॅनेजमेंट योजनेला एप्रिल २०२६ पासून राबवण्यास सुरूवात करेल,



अशी माहिती केंद्रीय मंत्री वैष्णव यांनी दिली आहे. प्रामुख्याने अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याची माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे. अश्विनी म्हणाले, "नव्याने मंजूर झालेल्या योजनेत सिंचन पाणीपुरवठा पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण करण्यावर लक्ष केंद्रित केले जाईल. यामधून कालवे किंवा अन्य पान २ वर

### सिंचन क्षेत्रात वाढ नाही

सिंचन प्रणालीत सुसूत्रता आणण्यासाठी रिअल टाइम वॉटर अकाऊंटींग मॅनेजमेंट आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. जेणेकरून पाणी वापर क्षमता सुधारता येणार आहे, असेही वैष्णव यांनी सांगितले. दरम्यान, देशात सिंचन खालील क्षेत्रात वाढ करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. परंतु त्यासाठी केंद्र सरकार ठोस पावले उचलत नाही. तसेच राज्य सरकारांकडून निश्चित कार्यक्रम आखला जात नाही. परिणामी देशातील विविध राज्यात सिंचनाखालील क्षेत्रात वाढ होत नसल्याचे जाणकार सांगतात.

# महाराष्ट्रातील निवडणुका घोटाळ्याने जिंकल्या!

## काँग्रेसच्या अधिवेशनात मल्लिकार्जुन खर्गे यांची भाजपवर सडकून टीका



**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

**काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल करत महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत "मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार" केल्याचा गंभीर आरोप केला आहे. अशा स्वरूपाचा घोटाळा यापूर्वी देशाने कधीही पाहिला नव्हता," असे म्हणत त्यांनी पुन्हा एकदा बॅलेट पेपरचा वापर करायला हवे असे मत व्यक्त केले.**

अहमदाबाद येथे आयोजित अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या (एआयसीसी) विशेष सत्रात बोलताना खर्गे यांनी पान २ वर

### लोकशाहीला नष्ट करण्याचा प्रयत्न


मी कुठेच ऐकले नाही, कुठेच पाहिले देखील नाही. भाजप इथे १५० जागा लढवते आणि त्यापैकी १३८ जागांवर जिंकून येते. ९० टक्के रिझल्ट? इतका मोठा रिझल्ट या देशात कधी पाहिला आहे का? आम्ही देखील अनेक निवडणुका पाहिल्या आहेत. मी सुद्धा १२ ते १३ निवडणुका लढलो आहे. असे कधीच झाले नाही. जो घोटाळा महाराष्ट्रात झाला तो फक्त लोकशाहीला नष्ट करण्यासाठी केला, तसेच विरोधकांचा पराभव करण्यासाठी हे केले आहे. आपल्याला या विरोधात लढायचे आहे, असेही खर्गे म्हणाले.

### ...तेव्हा आएएसएसने संविधान जाळले होते – राहुल गांधी

गुजरातमध्ये झालेल्या काँग्रेसच्या ८४व्या राष्ट्रीय अधिवेशनात राहुल गांधी म्हणाले, आम्ही ब्रिटिशांविरुद्ध आणि आरएसएसच्या विचारसरणीविरुद्ध लढलो. त्यांची विचारसरणी स्वातंत्र्यलढ्याची विचारसरणी नाही. ज्या दिवशी संविधान लिहिण्यात आले, त्याच दिवशी रामलीला मैदानात संघाने संविधान जाळले होते. वर्षानुवर्षे, आरएसएसने तिरंग्याला सलाम केलेला नाही. त्यांना भारतातील सर्व संस्थांवर नियंत्रण ठेवायचे आहे आणि देशातील सर्व पैसा अदानी-अंबानींना द्यायचा आहे, असे राहुल गांधी म्हणाले.

# शिवछत्र परिवाराने आणले गोदावरी नदी पात्रात पाणी

## शेतकरी व नागरिकांनी अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांचे मानले आभार



**गेवराई । प्रतिनिधी**

गोदापट्टयातील शेतकरी व नागरिकांनी केलेल्या मागणीची दखल घेऊन जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांनी शासन दरबारी सातत्याने प्रयत्न केल्यामुळे गोदावरी नदी पात्रात नाथसागरातून पाणी सोडण्यात आले आहे. उन्हाळ्यात गोदावरी पात्र पाण्याने भरले असून जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक भाऊसाहेब नाटकर, मदन भुसारे यांच्यासह गोदापट्यातील सरपंच, पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी पान २ वर

# दहशतवादी तहव्वूर राणाला आज भारतात आणण्याची शक्यता

## प्रत्यार्पणाचा फास आवळला, विशेष विमानाने आणले जाणार



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

२००८ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यात (२६/११) सहभागी असलेला दहशतवादी तहव्वुर राणा याच्या प्रत्यार्पणाला स्थगिती देण्याची विनंती करणारी याचिका अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. त्यामुळे त्याला भारतात परत आणण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. विशेष विमानाने तो गुरुवार,१० एप्रिल रोजी भारतात पोहोचण्याची शक्यता आहे. त्याच्यासोबत भारतीय गुप्तचर आणि तपास अधिकाऱ्यांचे एक विशेष पथक असणार आहे. पान २ वर

# चौसाळा ग्रामीण रुग्णालयाच्या इमारत बांधकामासाठी २४ कोटींचा निधी मंजूर

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मानले आभार





**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील चौसाळासह परिसरातील आरोग्य सुविधांमध्ये लक्षणीय वाढ होणार आहे. यासाठी राज्य सरकारकडून २४ कोटी ४५ लक्ष ६३ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून बुधवारी (दि.९) अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या निधीतून ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम होणार आहे. उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रयत्नातून हा निधी मंजूर झाला आहे. त्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी त्यांचे आभार मानले आहेत.

चौसाळा येथील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्यासाठी आणि जागा उपलब्धतेसाठी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी सातत्याने पाठपुरावा केलेला होता. आता त्यांच्या मार्गदर्शनाखाली निधीसाठी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी प्रशासकीय पान २ वर

# अखेर प्रशांत कोरटकरला जामीन मंजूर

कोल्हापूर। प्रतिनिधी



छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या प्रशांत कोरटकरला जामीन मंजूर करण्यात आला आहे. कोल्हापूर कोर्टाकडून जामीन मंजूर करण्यात आला आहे. कोरटकर ५ दिवस पोलीस कोठडी आणि १० दिवस न्यायालयीन कोठडीत असे एकूण पान २ वर

### बंगालमध्ये वक्फ कायदा लागू होणार नाही– ममता बॅनर्जी

कोलकाता । वृतसंस्थ

राज्यात वक्फ (दुरुस्ती) कायदा लागू केला जाणार नाही. अल्पसंख्याक लोकांचे आणि त्यांच्या मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी योग्य ती पावले उचलले जातील. मला माहिती आहे की, तुम्ही वक्फ कायद्याच्या अंमलबजावणीवर नाराज आहात. विश्वास ठेवा, बंगालमध्ये असे काहीही घडणार नाही, ज्यामुळे समाजात फूट निर्माण करून कोणीही राज्य करू शकेल, असे प्रतिपादन तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केले आहे. मुर्शिदाबादमध्ये वक्फ कायद्याच्या विरोधात निदर्शने करणाऱ्या लोकांमध्ये आणि पोलिसांमध्ये झालेल्या संघर्षादरम्यान बॅनर्जी यांनी बुधवारी वरीलप्रमाणे घोषणा केली.

# शिधापत्रिकेच्या ई–केवायसीला आता ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ

## ई–केवायसी न करणाऱ्यांची शिधापत्रिकेवरून नावे वगळली जाणार


**पुणे । प्रतिनिधी**



शिधापत्रिकेला आधार क्रमांक जोडून त्यानुसारच शिधापत्रिकेवरील नाव योग्य असल्याची खात्री करण्यासाठीची प्रक्रिया अर्थात ई-केवायसीसाठी राज्य सरकारने दिलेली ३१ मार्चची मुदत आता वाढवून ३० एप्रिल करण्यात आली आहे. त्यानंतर ई-केवायसी न करणाऱ्यांची शिधापत्रिकेवरून नावे वगळली जाणार आहेत. परिणामी त्यांना धान्य पान २ वर

# आज बीड ज़िल्हा शाश्वत विकास मंथन बैठक

**बीड । प्रतिनिधी**




ए एम २०३२ बीड लाईव्ह (अप्रतिम महावक्ता – पब्लिक टॅलेंट रियालिटी शो सिरीज २०३२ शाश्वत विकास ध्येयाच्या दिशेने) या पत्रकारांच्या पुढाकारातून राबवयाच्या कार्यक्रम मालिकेअंतर्गत साहित्यिका व सामाजिक कार्यकर्त्या डॉ.दीपा क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली आणि अविनाश पाठक, जिल्हाधिकारी, सचिन पांडकर पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०९ एप्रिल २०२५**

आवक क्किंटलमध्ये तर भाव प्रतिक्किंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २५.५० क्विंटल | २,५१७ | ३,१०० | २,६७९ |
| ज्वारी/हायब्रिड: १६६.५० क्विंटल | १,७३१ | २,९५१ | २,४२१ |
| मका/लोकल:३०.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : ५३.०० क्विंटल | ६,७५० | ७,१०० | ६,९४५ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ३५.५० क्विंटल | २,२४० | २,८१२ | २,४९५ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: ७३.०० क्विंटल | ४,१५० | ४,३५० | ४,२७५ |
| हरभरा: ३६.०० क्विंटल | ५,४५० | ५,५५१ | ५,५०२ |

# पत्रकारितेला जनसुरक्षा कायद्याचा फटका बसणार नाही–मुख्यमंत्र्यांचा शब्द



**मुंबई प्रतिनिधी**

**महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा या विधेयकाची ही प्रतिमा निर्माण झाली असेल तर ती दूर करण्याचे सर्वोतपरी प्रयत्न शासकीय पातळीवरून केले जातील असे सांगतानाच या विधेयकामुळे कुणाच्याही व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला घातला जाणार नाही, आणि पत्रकरांच्या निर्भीड पत्रकारितेला या विधेयकाचा कोणताही फटका बसणार नाही असा शब्द मुख्यमंत्र्यांनी दिला.**

महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयकातील तरतुदींवर विविध पत्रकार संघटनांनी घेतलेल्या

## पत्रकार संघटनांबरोबर देवेंद्र फडणवीस यांची बैठक

आक्षेपाची दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली. महाराष्ट्रातील विविध १२ संघटनांनी एकत्रित येत "पत्रकार अभिव्यक्ती संरक्षण मंच" स्थापन केला होता. या मंचाची बुधवारी सह्याद्री अतिथीगृहावर मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासोबत प्रदीर्घ चर्चा झाली. पत्रकार अभिव्यक्ती मंचच्यावतीने एस.एम.देशमुख, संदीप चव्हाण, दिलीप सपाते, यदु जोशी, विशाल सिंग, पंकज दळवी, इंद्रकुमार जैन, प्रदीप मैत्रा, दीपक भातूसे, श्रीकिशन काळे यांनी या मसुद्यातील विविध मुद्यांवरील पत्रकार संघटनांचे असणारे आक्षेप मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. हा कायदा म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील हल्ला असल्याचे प्रथमदर्शनी मत समाजाच्या सर्वच स्तरावर बनले असल्याकडेही पत्रकारांनी मुख्यमंत्री फडणवीसांचे लक्ष वेधले. यावेळी मुख्यमंत्री म्हणाले, मुळात शहरी नक्षलवाद संपुष्टात आणण्यासाठी हा कायदा बनविला जात आहे. हा कायदा कुणा व्यक्तीच्या विरोधात नसून तो नक्षली प्रवृतींना बळ देणाऱ्या संघटनांच्या विरोधात राबवविला जाणार आहे. त्यामुळे बंदी घातलेल्या संघटनांच्या आणि त्यांच्या कार्यकर्त्यांच्या संदर्भातच हा कायदा लागू होणार आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. पान २ वर

cmyk

अग्रलेख

# उलटा प्रवास : इंधन दर कमी करण्याऐवजी वाढविले


एलपीजी गॅस सिलिंडरच्या दरात ५० रुपयांची वाढ झाली आहे. प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या लाभार्थींनाही वाढ लागू होणार आहे. सरकारने पेट्रोल-डीझेलच्या उत्पादन शुल्कातही २ रुपयांची वाढ केली आहे. यामुळे तत्काळ प्रभावाने इंधनाच्या किमती वाढल्या नसल्या, तरी सरकारचा जुना अनुभव पाहता ही वाढ होणारच नाही असे कोणी म्हणू शकत नाही. महागाई नेहमीप्रमाणे वाढलेली आहेच, सिलिंडरही महाग केले आहे. मध्यम किंवा सर्वसामान्य वर्गाला हा एक झटकाच आहे व पेट्रोल-डीझेलच्या भविष्यात होणाऱ्या दरवाढीमुळे एक वर्तुळ पूर्ण होणार आहे.

वास्तविक अचानक वाढ करावी असे काही कारण नव्हते. असलाच तर फक्त सरकार अधिक गब्बर व्हावे हाच यामागील हेतू असू शकतो. इंधन दरवाढ करायची झाल्यास प्रत्येक वेळी आंतरराष्ट्रीय बाजारातील दरांकडे बोट दाखवून आपली कातडी वाचवण्याचे धोरण आजपर्यंत स्वीकारलेले दिसते. तथापि, केंद्रातील आताचे मोदी सरकार मात्र गेल्या दहा वर्षांपासून उलट्याच दिशेने चालताना दिसले. जागतिक बाजारातील कच्च्या तेलाचे दर ४१ टक्क्यांनी कमी झाले आहेत. मोदी सरकार येण्याच्या अगोदर तत्कालीन संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या काळात कच्च्या तेलाचे दर १२५ ते १३० डॉलर प्रति बॅरलच्या पुढे गेले होते हे सगळ्यांना स्मरणात आहे. तरीही त्यावेळी सरकारने पेट्रोल ७० रुपये आणि डीझेल ४५ रुपये प्रति लिटर भावाने उपलब्ध करून दिले होते. गॅस सिलिंडरचेही दर आटोक्यात होते. त्या तुलनेत आज चित्र बरेच आशादायी होते. कच्च्या तेलाचा भाव आज ६५ डॉलर प्रति बॅरल असताना सरकारने द्यायचेच ठरवले तर ते नागरिकांना पेट्रोल आणि डीझेल अनुक्रमे ५१ आणि ४१ रुपयांना देऊ शकतात. मात्र त्यांना तसे करायचे नाही. जगाच्या बाजारातील घसरणीचा लाभ त्यांना स्वत:लाच घ्यायचा आहे. ग्राहकांवर आम्ही कोणताही बोजा पडू देणार नसल्याची मखलाशी सरकारमधील लोक करताना दिसत आहेत. जो दर कमी करून ग्राहकांना दिलासा मिळवून देणे अपेक्षित होते ते पैसे सरकारनेच उत्पादन शुल्कात वाढ करून परस्पर काढून घेतले. गॅस दरवाढीचा हेतू तेल कंपन्यांना झालेल्या ४३ हजार कोटी रुपयांच्या तोट्याची भरपाई करणे हा असल्याचे सांगितले जाते आहे. म्हणजे जे काही मिळणार असेल ते परस्पर हातचलाखीने आपल्याकडे वळवायचे आणि सर्वसामान्यांवर बोजा पडू देणार नाही, असा भास निर्माण करत स्वत:चीच पाठ थोपटून घ्यायची असा सरळ हिशेब आहे. अमेरिकेतील सत्तांतर आणि तेथे आलेल्या उथळ नेतृत्वामुळे जगात बराच गहजब माजला आहे. सोमवारी त्याचे भयावह ट्रेलर दिसले. जगभरातील शेअर बाजार धाडकन कोसळले. सगळेच आर्थिक तज्ज्ञ आर्थिक मंदीकडे इशारा करत असून सगळ्यांचे चेहरे अगदी निस्तेज झाले आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी दोन युद्ध सुरू असताना आगीत तेल ओतल्याप्रमाणे आणखीनच अनिश्चितता वाढवण्यासाठी पूर्ण शक्ती पणाला लावली आहे त्याची त्यांना किंचितही तमा नाही. त्यांच्या पक्षाकडूनही अर्थव्यवस्थांची अनिश्चितता सेलिब्रेट केली जाते आहे. ट्रम्प यांनी आपण वाढीव आयात शुल्क मागे घेणार नसल्याचे जाहीर केले आहे.

जगभरातील बाजारांत एवढ्या मोठ्या प्रमाणात पडझड व्हावी असे आपल्याला वाटत नाही व मुळात याची आपल्याला चिंताही नसल्याचे सांगत वाढीव शुल्क हे औषध आहे व आजार दूर करण्यासाठी आपल्याला ते घ्यावे लागेल असा पवित्रा त्यांनी घेतला आहे. आपल्या निर्णयाच्या समर्थनार्थ त्यांनी तेलाच्या, औषधांच्या कमी झालेल्या किमती, घटलेले व्याजदर आदी बाबींकडे लक्ष वेधले आहे. लोकांनी त्यांच्या विरोधात रस्त्यावर उतरून रोष व्यक्त केला असला तरी ते कुंभकर्णी निद्रेत गेले आहेत. या स्थितीत आपापल्या नागरिकांचे जीवनमान अधिक कष्टप्रद होणार नाही याची खबरदारी विविध देशांनी घेणे आवश्यक असताना भारतात मात्र पहिला फटका नागरिकांनाच देण्याचा प्रघात कायम आहे. पेट्रोल-डीझेलवरील उत्पादन शुल्काच्या वाढीबाबत विरोधी पक्ष अगोदरपासूनच प्रश्न उपस्थित करत आहेत. इतकी वाढ कशाच्या आधारावर केली गेली आहे हा त्यांचा सवाल आहे.

महागाईवर नियंत्रण मिळवण्यात सरकारला अद्याप यश आले नाही. त्यानंतर दिलासा देण्याऐवजी लोकांकडून काढून घेण्याच्याच मार्गाने जर सरकारला आपला खजिना भरावा लागत असेल याचा सरळ अर्थ असा होतो, की सरकारला महागाईची चिंता नाही. पूर्वी आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाच्या किमतींवर देशांतर्गत दर ठरत होते. ती पद्धतही बंद करण्यात आली. भविष्याचा विचार करून आपली तिजोरी भरण्याचा सरकारला अधिकार आहे, मात्र याचा अर्थ असा नाही, की सर्वसामान्यांच्याच खिशावर बोजा टाकण्याचा उपाय केला जावा. तेल आणि गॅस या सर्वसामान्यांसाठी मूलभूत गोष्टी आहेत. त्यांचे दर वाढतच जातात, त्या तुलनेत सामान्यांचे उत्पन्न वाढणार नसेल किंवा वाढत नसेल तर महागाई झेलणे आणखीनच अवघड होत जाईल. इंधनाच्या दराबाबत सरकारला व्यवहार्य धोरण ठरवावे लागणार आहे.

# मराठवाड्यासह राज्यात पुढील ५ दिवस पावसाचा इशारा



**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यातील तापमानाचा पारा चांगलाच वाढला आहे. बुधवारीही अकोल्यात सर्वाधिक तापमान होते. तर मराठवाडा, विदर्भ आणि दक्षिण महाराष्ट्रातील काही भागात अवकाळी पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला.**

हवामान विभागाने कोकणातील पालघर, मुंबई, ठाणे, रत्नागिरी, रायगड आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात काही ठिकाणी गुरूवारी उष्ण आणि दमट हवामानाचा अंदाज दिला. तर शुक्रवारपासून हवामान कोरडे राहील, असाही अंदाज हवामान विभागाने दिला. छत्रपती संभाजीनगर, अकोला, अमरावती, चंद्रपूर, धुळे, नंदूरबार, जळगाव आणि नाशिक जिल्ह्यातही काही ठिकाणी गुरूवारी उष्ण तसेच दमट हवामानाचा अंदाज आहे. बीड जिल्ह्यासह परभणी, लातूर, धाराशिव आणि नांदेड जिल्ह्यात जिल्ह्यात गुरूवारी आणि शुक्रवारी हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज देण्यात आला. अमरावती, गडचिरोली आणि गोंदीया जिल्ह्यात शनिवारी, भंडारा जिल्ह्यात रविवारी, तर वाशीम जिल्ह्यात शुक्रवारी, यवतमाळ जिल्ह्यात शुक्रवारी आणि शनिवारी तसेच चंद्रपूर जिल्ह्यात शुक्रवार, शनिवार आणि रविवारी विजा आणि ढगांच्या गडगडाटासह हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज आहे. राज्यात उन्हाचा चटकाही चांगलाच वाढला. विदर्भातील बहुतांशी भागात तापमान ४० अंशाच्या वर आहे. अकोल्यात राज्यातील सर्वाधिक ४४.१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली होती. तर अमरावतीत ४३ अंश सेल्सिअस तापमान होते.

# विभागीय आयुक्त साधणार नागरिकांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे संवाद

**जालना । प्रतिनिधी**

**मराठवाडा विभागातील आठही जिल्हयातील नागरिक आपल्या विविध कामानिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात प्रशासकीय अधिकारी यांच्या भेटीसाठी, निवेदने देण्यासाठी येतात. आपल्या प्रशासकीय समस्यांचे निवारण करून घेण्यासाठी नागरिक येत असतात, मात्र विभागीय पातळीवरील अधिकारी अनेकदा कामानिमित्त दौऱ्यावर किंवा अन्य कामामुळे त्यांची भेट होत नाही, हीच बाब विचारात घेत विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी नागरिकांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे थेट संवाद साधण्यासाठीचा 'संवाद मराठवाडयाशी' हा उपक्रम हाती घेतला आहे. राज्यातील या नाविण्यपूर्ण उपक्रमाचा प्रारंभ येत्या ११ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ४ वाजता होणार आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाबाबत विभागीय आयुक्त श्री गावडे नागरिकांशी संवाद साधणार आहेत.**

विभागीय आयुक्त श्री गावडे यांच्या संकल्पनेतून 'एक दिवस गावकऱ्यांसोबत' या उपक्रमाची सुरूवात झाली आणि संपूर्ण प्रशासन थेट गावात पोचले. या उपक्रमाच्या यशानंतर विभागीय आयुक्त श्री गावडे यांनी मराठवाडा विभागातील आठही जिल्हयातून छत्रपती संभाजीनगर येथे प्रशासकीय कामानिमित्त येण्यासाठी नागरिकांना होणारा त्रास थांबविण्यासाठी नागरिकांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे 'संवाद मराठवाडयाशी' या उपक्रमाची सुरूवात करण्याचा निर्णय घेतला आहे. ११ एप्रिल रोजी दुपारी ४ ते ६ या वेळेत विभागीय आयुक्त श्री गावडे महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाबाबत संवाद साधणार आहेत. श्री. गावडे यांच्यासमवेत यावेळी विभागीय पातळीवरील प्रशासकीय अधिकारीही उपस्थित असणार आहेत. प्रत्येक आठवडयात दर बुधवारी ४ ते ६ यावेळेत आयुक्त नागरिकांशी संवाद साधतील. प्रत्येक संवादावेळी प्रशासकीय विभाग व विषय ठरविण्यात येणार असून यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेशी सबंधित विषयावर विभागीय आयुक्त श्री गावडे नागरिकांशी संवाद साधणार आहेत. नागरिकांनी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेशी सबंधित योजना, प्रश्न, असलेल्या अडचणी, योजनेच्या अंमलबजावणीचे धोरण तसेच याबाबत असलेल्या अडचणीबाबत थेट विभागीय आयुक्त यांच्याशी संवाद साधता येणार आहे. नागरिकांनी या उपक्रमात आपला सहभाग नोंदवावा, असे अवाहन विभागीय उपायुक्त डॉ. अनंत गव्हाणे यांनी केले आहे. याबाबतचा क्युआर कोडही प्रसिदध करण्यात येत आहे. नागरिकांना आपल्या मोबाईलव्दारे या उपक्रमात सहभागी होता येणार आहे.

# चौसाळा ग्रामीण रुग्णालयासाठी माजी मंत्री क्षीरसागर यांचे प्रयत्न कामी आले

## सरपंच बाबुशेठ लोढांच्या पाठपुराव्याला यश

**बीड । प्रतिनिधी**

**गेल्या चार वर्षापासून माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी चौसाळा ग्रामीण रुग्णालयाच्या निधी मंजुरीसाठी आणि जागा उपलब्धतेसाठी सातत्याने प्रयत्न केले आणि त्यामुळेच आज २४ कोटी ४५ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती चौसाळ्याचे सरपंच बाबुशेठ लोढा यांनी दिली.**

चौसाळा येथे ग्रामीण रुग्णालय सर्व सोयीनीयुक्त व्हावे यासाठी चौसाळ्याचे सरपंच बाबुशेठ लोढा यांनी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यानुसार माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी चार वेळा बैठका घेऊन तत्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांना याबाबत तातडीने पावले उचलण्यास सांगितले त्यानुसार जिल्हाधिकारी मुधोळ यांनी देखील मोठे सहकार्य केले. त्यांच्या कार्यकाळातच ग्रामीण रुग्णालयासाठी जागा उपलब्ध करण्यात आली. त्यानंतर या ठिकाणी निधी मंजूर करण्यासाठी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी मंत्रालयात राज्याचे आरोग्य मंत्री, संबंधित खात्याचे सचिव, तसेच ओमप्रकाश शेटे यांच्याकडे सातत्याने याबाबत पाठपुरावा केला. त्यानुसार या रुग्णालयाच्या उभारणीसाठी २४ कोटी ४५ लाख रुपये निधी मंजूर झाला असून चौसाळा आणि परिसरासाठी हे रुग्णालय उपयुक्त ठरणार असल्याचे सरपंच बाबुशेठ लोढा यांनी सांगितले. या रुग्णालयासाठी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या प्रयत्नामुळेच जागा आणि निधी मिळाला असल्याचेही ते म्हणाले.



बीडः एसटी को ऑप बँक बीड यांच्या वतीनेशिरीष व. इनामदार यांची महाव्यवस्थापक( लेखा व वित्त विभाग ) एसटी को.ऑप बँक मुंबई पद्दोन्नती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. या प्रसंगी तनजीर सय्यद, कल्पना खंडागळे,निकिता चव्हाण, आरसी सूरवसे, सय्यद सरफराज, प्रशांत जाधव, शेख रशीद भाई, राजेश बांगर व इतर कर्मचारी हजर होते.

# गटविकास अधिकाऱ्यांनी कॅमेरे बघून दंड करावे




**जालना । प्रतिनिधी**

अंबड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी दि८ एप्रिल रोजी अचानक पंचायत समिती कार्यालय मध्ये पाहणी करताना त्यांना बऱ्याच ठिकाणी बंदी असलेला गुटखा खाणाऱ्यांनी पिचकारी मारून कोटी रुपयाची इमारत थुकून घाण केली. पण याप्रकरणी कॅमेरे बघून चौकशी केल्यास पिचकारी कोण मारतात हे लक्षात येईल व त्या व्यक्तीवर दंड करावे असे पण बोलल्या जात आहे. सदरील प्रकरणी आमचे वृत्तपत्राचे प्रतिनिधी शिवाजी मस्के हे कार्यालयामध्ये अचानक गेले असता त्यांना हा प्रकार दिसून आला. यावेळी मोठ्या आवाजामध्ये गट विकास अधिकारी यांनी पिचकारी मारून घाण करणाऱ्या विरुद्ध कारवाई करण्यात येईल अशा सूचना देण्यात आल्या यासंदर्भात काही कर्मचाऱ्यांना विचारले असता ते म्हणाले की बाहेरून येणारे व्यक्ती गुटखा खाऊन येतात व खिडकी मधून थुकून घाण करतात सदरील व्यक्तीवर कारवाई करणे गरजेचे आहे . आता यापुढे काय कारवाई होतं का दंड होतो हे बघणं गरजेचं आहे.

# पान १ वरून...

## पंतप्रधान कृषी सिंचन

सिंचन स्त्रोतापासून शेतकऱ्यांच्या शेतात पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यात आहे,'' असा दावाही वैष्णव यांनी केला आहे. तसेच सिंचन प्रणालीवर भर देण्यात येणार असल्याची माहिती वैष्णव यांनी दिली. ते पुढे म्हणाले, ''सूक्ष्म सिंचन प्रणालीसाठी विशेषत: दाबयुक्त भूमिगत पाईपलाईन वापरुन, मजबूत पायाभूत सुविधा निर्माण करण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे.'' असंही वैष्णव यांनी प्रतिपादन केले.

-----------

----------

## महाराष्ट्रातील निवडणुका

केंद्रातील मोदी सरकारवर जोरदार टीका केली. गुजरातमधील अहमदाबाद येथे काँग्रेस पक्षाचे ८४ वे अधिवेशन सुरू आहे. या पार्श्वभूमीवर देशभरातून १७०० हून अधिक काँग्रेस प्रतिनिधी यात सहभागी होत आहेत. अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे बोलताना ते म्हणाले की, हे सरकार भांडवलदारांच्या फायद्यासाठी काम करत असून, सरकारी मालमत्ता विकून लोकशाही हळूहळू संपवण्याचा प्रयत्न करत आहे. ते पुढे म्हणाले, संपूर्ण जग पुन्हा बॅलेट पेपरकडे वळत आहे, मात्र आपण अजूनही ईव्हीएमवर विसंबून आहे. ही सगळी एकप्रकारची फसवणूक असून, सत्ताधारी पक्षाच्या फायद्यासाठी ईव्हीएमचा वापर केला जातो. महाराष्ट्रातील निवडणुकीचा संदर्भ देत ते म्हणाले की, महाराष्ट्रात नक्की काय झाले? आम्ही हे प्रकरण प्रत्येक ठिकाणी मांडले. राहुल गांधींनीही या मुद्द्यावर जोरदार आवाज उठवला. मतदार याद्यांमध्येही घोटाळा झाला. हरियाणामध्येही असेच काहीसे घडले. यावेळी खर्गे यांनी दावा केला की, ''भाजपने ९० टक्के जागा जिंकल्या, हे याआधी कधीच घडले नव्हते. महाराष्ट्रात जो प्रकार घडला, तो लोकशाहीसाठी अत्यंत धोकादायक होता. आम्ही या प्रकरणाचा पूर्ण तपास करू. चोर शेवटी पकडला जातोच. आमचे वकील आणि नेते यासाठी सतत प्रयत्न करत आहेत. गेल्या ११ वर्षांपासून भाजप सरकार संविधानावर सतत हल्ला करत आहे. संवैधानिक संस्था आणि मूल्यांवर गदा आणली जात आहे. याचे संरक्षण करणे आपली जबाबदारी आहे, असे आवाहनही त्यांनी कार्यकर्त्यांना केले आहे.

--------------

## अखेर प्रशांत कोरटकरला

१५ दिवस तुरुंगात होता. महापुरुषांचा अवमान करणा-या प्रशांत कोरटकरच्या जामिनाचा मार्ग दिवाणी न्यायालयानं बंद केल्यानंतर कोरटकरनं जामीन मिळवण्यासाठी धावाधाव केली. प्रशांत कोरटकरच्या वकिलांनी तातडीनं सत्र न्यायालयात अर्ज करण्यासाठी कागदपत्रं मिळवण्यासाठी बरीच धावाधाव केली. प्रशांत कोरटकरला अटक केल्याच्या पहिल्या दिवसापासून प्रशांत कोरटकर कोठडी टाळण्याचा प्रयत्न करत होता.

-----------

## चौसाळा ग्रामीण रुग्णालयाच्या इमारत

पातळीवर पाठपुरावा केला आहे. भरीव निधी प्राप्त झाल्यामुळे चौसाळा परिसरातील हजारो नागरिकांना दर्जेदार आणि आधुनिक वैद्यकीय सुविधा स्थानिक पातळीवरच मिळू शकणार आहेत. आतापर्यंत अनेकवेळा रुग्णांना प्राथमिक उपचारासाठी जिल्हा रुग्णालय गाठावे लागत होते. मात्र, ग्रामीण रुग्णालय स्थापन झाल्यानंतर विविध उपचार, तपासण्या व तातडीच्या सेवा याठिकाणीच उपलब्ध होतील. या रुग्णालयासाठी निधी मिळवण्यासाठी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी गेल्या काही दिवसांपासून सातत्याने पाठपुरावा केला होता. विविध स्तरावर पाठपुरावा करून त्यांनी ही मागणी शासनदरबारी मांडली होती. त्यांच्या या प्रयत्नांना आता यश आले असून, त्यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विशेष आभार मानले आहेत. या निर्णयामुळे चौसाळा परिसरातील आरोग्यसेवा क्षेत्रात मोठी क्रांती होणार असून, गावातील नागरिकांबरोबरच आजूबाजूच्या भागातील लोकांनाही त्याचा लाभ मिळणार आहे. लवकरच कामाला सुरुवात होणार असून, येत्या काही महिन्यांत ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम व सुविधा उभारणीचे काम वेगात सुरू होईल, अशी माहितीही मिळत आहे.

-------------

## दहशतवादी तहव्वूर राणाला

पाकिस्तानी वंशाचा कॅनेडियन उद्योगपती तहव्वुर राणा (वय ६४) लवकरच अमेरिकेतून भारतात प्रत्यार्पित केला जाऊ शकतो. भारतातील तपास यंत्रणांचे पथक अमेरिकेत पोहोचले आहे. सध्या हे पथक अमेरिकन अधिकाऱ्यांसोबत सर्व कागदपत्रे आणि कायदेशीर औपचारिकता पूर्ण करण्यात व्यस्त आहे. राणाच्या प्रत्यार्पणाची प्रक्रियेला वेग आला आहे. राणाने आपले प्रत्यार्पण थांबवण्यासाठी अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात आपत्कालीन याचिका दाखल केली होती. अर्जात त्याने दावा केला होता की तो पाकिस्तानी वंशाचा मुस्लिम आहे, त्यामुळे भारतात त्याचा छळ केला जाईल, म्हणून त्याचे प्रत्यार्पण थांबवावे. राणा यांनी त्यांच्या खराब प्रकृतीचे कारणही दिले होते. मागील महिन्याच्या सुरुवातीला सर्वोच्च न्यायालयाने तहव्वुरची याचिका फेटाळून लावली होती.

**ट्रम्प प्रशासनाने दिली प्रत्यार्पणाला मान्यता**

राणा सध्या लॉस एंजेलिसमधील मेट्रोपॉलिटन डिटेन्शन सेंटरमध्ये आहे. तहव्वुर राणा हा २६/११ हल्ल्यातील मुख्य सूत्रधारांपैकी एक असलेल्या पाकिस्तानी-अमेरिकन दहशतवादी डेव्हिड कोलमन हेडलीचा जवळचा आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाने गेल्या महिन्यात राणाच्या प्रत्यार्पणाला मान्यता दिली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत बोलताना ट्रम्प यांनी घोषणा केली होती.

**देशाला हादरवून टाकणारा २६/११ दहशतवादी हल्ला**

२६ नोव्हेंबर २००८ रोजी १० पाकिस्तानी दहशतवाद्यांनी अरबी समुद्र ओलांडून समुद्री मार्गाने मुंबईत घुसखोरी केली. रेल्वे स्टेशन, दोन हॉटेल्स आणि एका ज्यू केंद्रावर एकाचवेळी हल्ला केला होता. सुमारे ६० तास चाललेल्या या हल्ल्यात १६६ नागरिक ठार झाले होते. या हल्ल्याने संपूर्ण देशाला हादरवून टाकले. दहशतवादी अजमल अमीर कसाबला जिवंत पकडण्यात आले. नोव्हेंबर २०१२ मध्ये कसाबला पुण्यातील येरवडा तुरुंगात फाशी देण्यात आले आहे.

-------------

## आज बीड जिल्हा शाश्वत

अप्पर पोलीस अधीक्षक बीड यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड जिल्हा शाश्वत विकास मंथन बैठकीचे दि. १० एप्रिल २०२५ गुरुवार रोजी सकाळी १० वाजता, के एस के कॉलेज येथे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील राजकीय, शासकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, पर्यावरण, उद्योग व्यापार यासह विविध क्षेत्रातील संस्था तसेच युवा वर्ग, महिला संघटना व नागरिकांच्या सांघिक सहकार्यातून प्रिंट, इलेक्ट्रॉनिक व नव माध्यमातील पत्रकार आगामी काळासाठी विशेष उपक्रम राबविणार आहेत. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी अर्थातच राजकीय व सर्व क्षेत्रातील सामाजिक संस्थांचा आणि मुख्य म्हणजे शासकीय, निम शासकीय अधिकाऱ्यांचा सक्रिय सहभाग अपेक्षित आहे. बैठकीमध्ये ज्येष्ठ पत्रकार डॉ. अनिल फळे हे सदर कार्यक्रम मालिकेबद्दल सादरीकरण करतील. त्या सादरीकरणाच्या अनुषंगाने आपल्या सूचना व सहकार्य लक्षात घेऊन बीड शहर व जिल्ह्यामध्ये विविध कार्यक्रम राबविले जातील; त्यासंबंधी आपल्या सूचना, सहकार्य व मार्गदर्शन आवश्यक आहे. या बैठकीसाठी संबंधितांनी अवश्य उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजक दिलीप खिस्ती, समन्वयक विशाल साळुंके, अनिल जाधव आणि विविध संपादक, पत्रकार संघटना सदस्यांनी केले आहे.

-------------

## शिधापत्रिकेच्या ई-केवायसीला

मिळणार नाही, असा इशारा राज्य सरकारने दिला आहे. जिल्ह्यात ई-केवायसी केलेल्यांची संख्या आता सुमारे १८ लाख अर्थात ६७ टक्के झाली आहे. तर अजूनही ८ लाख ८० हजार लाभार्थ्यांची ई-केवायसी झालेली नाही. सर्वोच्च न्यायालय तसेच केंद्र सरकारने राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतील सर्व लाभार्थ्यांची ई-केवायसी पडताळणी करण्याच्या सूचना यापूर्वीच राज्य सरकारला दिल्या आहेत. त्यानुसार राज्यातील सर्व रास्त भाव दुकानांवर ई-केवायसी मोहीम हाती घेऊन ही कार्यवाही लवकर पूर्ण करण्याच्या सूचना सर्व क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आल्या आहेत. ही प्रलंबितता मोठी असल्याने यासाठी यापूर्वी अनेकदा मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर ३१ मार्चची अंतिम मुदत देण्यात आली. मात्र, ई-केवायसी न केलेल्यांची संख्या मोठी असल्याने राज्य सरकारने त्याला पुन्हा मुदतवाढ देत ३० एप्रिल अखेरची तारीख ठरविली आहे. त्यानुसार राज्य सरकारने यासंदर्भात कार्यवाही करण्यासाठी सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी आणि अन्नधान्य वितरण अधिकाऱ्यांना प्रत्येक आठवड्याला प्रलंबित ई-केवायसी पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत.

------------

## पत्रकारितेला जनसुरक्षा कायद्याचा

हा कायदा याआधी छत्तीसगड, तेलंगणा आणि ओरिसासारख्या नक्षलग्रस्त राज्यात लागू झालेला आहे. पण महाराष्ट्रात हा कायदा अस्तित्वात नाही. त्यामुळे या सगळ्या नक्षली संघटनांची मुख्य कार्यालय ही महाराष्ट्राच्या नक्षल भागात थाटली जात आहेत. या नक्षली कारवायांना पायबंद घालण्यासाठी अशा कठोर कायद्यांची गरज असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले. या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी तीन सदस्यीय न्यायाधिशांची समिती गठीत केली जाणार असून, त्यांच्या मान्यतेनंतरच या कायद्याखाली गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. त्यामुळे या कायद्याचा दुरूपयोग होऊ शकणार नाही असेही फडणवीस यावेळी म्हणाले. त्यातही काही मुद्द्यांवर जर पत्रकार संघटनांच्या सूचना असतील तर त्या त्यांनी लेखी द्या त्याचा अंतिम मसुदा करताना नक्की विचार करू असे आश्वासनही फडणवीस यांनी यावेळी दिले.

या बैठकीला मुंबई मराठी पत्रकार संघ, मराठी पत्रकार परिषद, मुंबई प्रेस क्लब, विधीमंडळ वार्ताहर संघ, अधिस्विकृती पत्रकार समिती, टीव्ही जर्नालिस्ट असोसिएशन, बृहन्मुंबई यूनियन ऑफ जर्नालिस्ट, बृहन्मुंबई महानगरपालिका वार्ताहर संघ, मुंबई क्राइम रिपोर्टर असोसिएशन, पुणे श्रमिक पत्रकार संघ, मुंबई हिंदी पत्रकार संघ, नॅशनल यूनियन जर्नालिस्ट ऑफ इंडिया आणि जर्नालिस्ट यूनियन ऑफ महाराष्ट्र आदी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

--------

## शिवछत्र परिवाराने आणल

व नागरिकांनी माजी आमदार अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांचे आभार मानले आहेत. गोदाकाठच्या गावांमध्ये तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली होती. गोदावरी नदी कोरडी पडली होती. जनावरांसह नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. याबाबत जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांच्या कडे गोदाकाठच्या शेतकऱ्यांनी आपला प्रश्न मांडला होता. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर गंभीर दखल घेऊन अमरसिंह पंडित यांनी शासन दरबारी प्रयत्न करुन हा प्रश्न चुटकीसरशी सोडवला आहे. जायकवाडी धरणाच्या पैठण उजव्या कालव्यातून गुळज येथील सी.आर. ३ व तळणेवाडी येथील सी.आर. ४ मधुन गोदावरी नदी पात्रात पाणी सोडण्यात आले आहे. यामुळे गेवराई व अंबड तालुक्यातील गोदाकाठच्या दोन्ही बाजुच्या शेतकरी व नागरीकांना या पाण्याचा फायदा झाला असून सर्व शेतकरी व नागरीकांनी आनंद व्यक्त केला आहे. गोदापटट्यातील नागझरी ख खामगाव, सावळेश्वर, राक्षसभुवन सुरळेगाव व ईतर सर्व शेतकऱ्यांच्या वतीने अमरसिंह पंडित साहेब व आ. विजयसिंह पंडित यांनी गोदावरी नदी पात्रात पाणी आणल्या बद्दल शेतकऱ्यांनी आनंद साजरा केला.

**तर ८ क्युबिक क्युसेक मिटर पाणी मिळाले असते-भाऊसाहेब नाटकर**

या बाबत माहिती देताना जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक भाऊसाहेब नाटकर म्हणाले की, लोकनेते अमरसिंह पंडित व आ. विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून गोदापटट्यातील सर्व नागरिकाच्या वतीने फक्त गेवराई तालुक्यांच्या मागणीनुसार तेवढेच पाणी सुटले, जसे गेवराई तालुक्यातील नागरिकांनी प्रस्ताव दिले तसेच अंबड तालुक्यातील नागरीकांनी प्रस्ताव दिल प्रस्ताव दिले होते परंतु त्यांनी विहित नमुन्यात प्रस्ताव न दिल्याने जास्तीचे पाणी त्यांना मिळाले नाही. गेवराई तालुक्यातील मागणीनुसार तेवढेच पाणी सुटले. अंबड तालुक्यातील नागरिकाच्या मागनी प्रमाणे पाणी आले असते तर पाथरवाला परिसराला फायदा झाला असता. वाळकेश्वर संगमजळगाव अगरनांदर व हिंगणगाव या भागातील शेतकऱ्यांनी जसा प्रस्ताव पाहिजे होता तसा त्यानी दिला नाही या कारणानी अंबड तालुक्यातील नागरीकाची मागणी तसीच राहीली. पाहिजे त्या नमुन्यामधे प्रस्ताव दाखल केल्यामुळे ३ क्युबिक क्युसेक मिटर पाणी सुटले. अंबड तालुक्यातील नागरीकांचा प्रस्ताव आला असता तर ८ क्युसिक मिटर पाणी सुटले आसते आणि शहागडच्या बंधारावरुध पाथरवाला बंधारा पर्यंत पाणी आले आसते अशी प्रतिक्रिया जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक भाऊसाहेब नाटकर यांनी यावेळी दिली. गोदावरी नदी पात्रातील शहागड को.प.बंधाऱ्यांचे बॅरेज मध्ये रुपांतर करण्याची मागणी आपण आ. विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या कडे केली असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

--------------

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार, दि. १० एप्रिल २०२५

३

## श्रीक्षेत्र भगवानगड विकासासाठी ६७ लाख रुपयांची देणगी

जालना । प्रतिनिधी



भगवान बाबा गडा विकासासाठी घनसावंगी तालुक्यातील रामगव्हाणकरांनी ६७ लाखांची देणगी जमा करून भगवान गडाचे महंत डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांच्याकडे सुपूर्द केली आहे. श्रीक्षेत्र भगवानगडाच्या विकासासाठी रामगव्हाण येथील भाविकांनी ६७लाखांची देणगी जमा केली आहे. ग्रामस्थांनी गडाचे महंत डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांच्याकडे ही रक्कम सुपूर्द केली. अवघ्या १०० उंबऱ्यांच्या गावाने इतकी मोठी देणगी दिली आहे. भगवानगडावर होणाऱ्या माउलींच्या मंदिरासाठी हा निधी देण्यात आला आहे. यात सर्व जाती-धर्मांच्या लोकांनी सहभाग घेतला आहे. भगवानगडाचे महंत डॉ. नामदेव शास्त्री महाराज रामगव्हाण येथे अखंड हरिनाम सप्ताह सांगतेसाठी आले होते. या वेळी त्यांची मिरवणूक काढण्यात आली. रामगव्हाण गावात आगमनापूर्वी वडीगोद्री येथे आतषबाजी करून फुलांचा वर्षाव करत शाल व हार घालून महंत डॉ. नामदेव शास्त्री यांचे स्वागत करण्यात आले. डॉ. शास्त्री यांनी गडावरील विकासाबाबत तसेच ज्ञानेश्वर माउली मंदिराच्या बांधकामाबाबत माहिती दिली. तसेच गावकऱ्यांसोबत यथोचित संवाद साधला. या वेळी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठा विद्यार्थ्यांच्या वसतीगृहासाठी आ.विजयसिंह पंडित यांचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना साकडे

## आ. विजयसिंह पंडित यांची शासन निर्णयात सुधारणा करण्याची मागणी

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह सुरु करण्याचे आश्वासन यापूर्वी शासनाने दिले आहे. त्याप्रमाणे जिल्हा स्तरावर वसतीगृह सुरु करावेत अशी मागणी यापूर्वी आ. विजयसिंह पंडित यांनी विधानसभेत केले होते. याप्रकरणी त्यांनी उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांना साकडे घातले असून छत्रपती शिवाजी महाराज सारथी जिल्हास्तरीय वसतीगृह सुरु करण्यासाठी प्रचलित शासन निर्णयात सुधारणा करून सुधारीत शासन निर्णय निर्गमित करून वसतीगृह सुरु करण्यात येणारे अडसर दूर करण्याची मागणी आ.विजयसिंह पंडित यांनी ना.अजितदादा पवार यांच्याकडे केली आहे.

मराठा आरक्षण आंदोलनात सरकारने राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी मराठा आणि कुणबी समाजातील विद्यार्थ्यांना वसतीगृहाची सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते. सारथीकडून या बाबत प्रक्रिया सुरु करण्यात आली मात्र उच्च शिक्षण विभाग आणि नियोजन विभागातील विसंवादामुळे छत्रपती शिवाजी महाराज सारथी जिल्हास्तरीय वसतीगृह स्थापन करण्यास विलंब होत असल्याची बाब आ. विजयसिंह पंडित यांनी विधानसभेत आवाज उठवून शासनाच्या निदर्शनास आणून दिली होती. मात्र या बाबत कार्यवाहीस विलंब होत असल्या बाबत त्यांनी मंगळवार, दि.८ एप्रिल रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांची भेट घेऊन त्यांना या बाबतचे लेखी निवेदन देऊन जिल्हा स्तरावरील मराठा समाजाची वसतीगृहे सुरु करण्यात येणारे अडसर दूर करण्याची मागणी केली. छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) यांचेकडून जिल्हास्तरावर वसतीगृह सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला. मात्र प्रत्यक्षात जिल्ह्याच्या ठिकाणी अद्याप मराठा विद्यार्थ्यांना वसतीगृहाची सुविधा मिळत नाही. सारथीच्या व्यवस्थापकीय संचालकांनी या बाबत सविस्तर पत्र लिहून शासन निर्णयात सुधारणा करण्याची मागणी शासनाकडे केली आहे. परंतु त्याची दखल



प्रशासकीय पातळीवर घेतली नसल्यामुळे याप्रकरणी विलंब होत आहे. हाच मुद्दा आ. विजयसिंह पंडित यांनी विधानसभेत उपस्थित केला होता.या बाबतची माहिती देताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, शासनाच्या विविध योजनेत ज्या विभागाकडून वसतीगृहे चालविली जातात त्याच विभागाकडून लाभार्थी विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर निर्वाह भत्त्यासह इतर निधी जमा केला जातो. आदिवासी विभाग, सामाजिक न्याय विभाग यांसह इतर विभागांमध्ये ही पध्दत अवलंबविली जाते मात्र सारथीकडून चालविल्या जाणाऱ्या वसतीगृहासाठी लाभार्थी विद्यार्थ्यांचा निर्वाह भत्ता उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून दिला जावा अशी तरतुद शासन निर्णयात केली आहे. वसतीगृह चालविणारा विभाग आणि निर्वाह भत्ता अदा करणारा विभाग वेगवेगळा असल्यामुळे प्रशासकीय दृष्टीने ही बाब गैरसोयीची ठरत आहे. त्याचबरोबर जिल्हाधिकाऱ्यांनी ठरवून दिलेले शुल्क विद्यार्थ्यांनी वसतीगृह चालविणाऱ्या संस्थेला देण्याची तरतुद असली तरी ही रक्कम विद्यार्थी संस्था चालकांना देतील याची हमी संस्था चालकांना वाटत नसल्यामुळे वसतीगृह सुरु करण्यास अडचण येत आहे.

पुढे बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, दि.०९.११.२०२३ रोजीच्या शासन निर्णयात दुरुस्ती करून सारथीकडून चालविण्यात येणाऱ्या वसतीगृहासाठी संस्था चालक आणि विद्यार्थी यांना द्यावयाच्या अनुदान व इतर निधी देण्यासाठी पारदर्शक व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता आहे. सारथीच्या संचालक मंडळातील सदस्यांनी अनेक जिल्हाधिकाऱ्यांशी या बाबत चर्चा करून तसा अहवाल शासनाला सादर केला आहे. या मधील त्रुटी दूर करून शासनाने उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि नियोजन विभाग यांच्यातील विसंवाद दूर करून मराठा व कुणबी विद्यार्थ्यांसाठी राज्यभरातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी वसतीगृहाची सुविधा विनाविलंब सुरु करावी अशी मागणी आ. विजयसिंह पंडित यांनी उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांची भेट घेवून त्यांना या बाबतचे निवेदन देऊन केली आहे.



नवोपक्रम स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्यातून प्रथम येण्याचा बहुमान शिक्षक सेनेचे तालुकाध्यक्ष उद्धवजी घोडके सरांना मिळाला, तसेच सम्यक वाघमारे या विध्यार्थ्याने नवोदय परीक्षेत घवघवीत यश मिळवून गडी येथील नवोदय विद्यालयात प्रवेश मिळवला. त्याबद्दल त्यांचा सत्कार करताना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम, जिल्हा समन्वयक संजयजी महाद्वार, जिल्हा प्रवक्ता गणेशजी जाधव , विधानसभा प्रमुख सुशीलजी पिंगळे, शिक्षकसेनेचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण बहिरवाळ, सरचिटणीस नरेश गंधगे, प्रसिद्धीप्रमुख लक्ष्मण वाघमारे, घाडगे सर , महादेवजी चव्हाण, सुग्रीवजी तांदळे , प्रमोद कुलकर्णी सह आदी.

## तब्बल १२५ मुलींच्या लग्नात संसारपयोगी वस्तू मोफत देणाऱ्या प्रभुलिंग पाटील यांच्या कार्याला सलाम.!

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील पण व्यवसायामुळे पुणे येथे स्थाईक झालेले बांधकाम व्यवसायिक प्रभुलिंग पाटील यांनी आजपर्यंत गावातील तब्बल १२५ गोरगरिब मुलींच्या लग्नात प्रत्येकी ५ हजार रूपये किंमतीचे संसार उपयोगी साहित्याचे मोफत वाटप केले



असे म्हणतात कि पैसा हा प्रत्येकाकडेच असतो पण तो खर्च करण्याची दानत प्रत्येकाकडे आहे असे नाही ज्याला त्याचा सदुपयोग करता आला किंवा तो गरजवंताला दान करता आला तरच त्याच मोल होते असे म्हटले जाते अगदी याच प्रमाणे युसूफवडगांव येथील पण पुणे स्थाईक झालेले बांधकाम व्यवसायिक प्रभुलिंग पाटील यांनी गावची नाळ कधी तुटी दिली नाही तर ती कशी आधिक घट्ट होईल याची काळजी घेतात आपण केलेल्या सहकार्याने जर कोणाचे चांगले होत असेल तर त्यात वावगे आहे असा विचार करून आपल्या सामाजिक कार्याची सेवा ते गेल्या काही वर्षापासुन अविरतपणे करत आहेत.त्यांनी आजपर्यंत गावातील तब्बल १२५ गोरगरिबांच्या मुलींच्या लग्नात त्यांना भाऊरायाची ओवाळणी म्हणुन ते ५ हजार रुपये किंमतीचे संसार उपयोगी साहित्य देत आहेत इतकेच नव्हे तर आपल्या दोन्ही मुलीच्या किंवा स्वतःच्या वाढदिवसाच्या निमित्त असो किंवा दिवाळीचा सण असो अशा प्रत्येक वेळी ते अनाथ आश्रम व वृद्धाश्रमात न चुकता अन्नदान करण्याचे काम गेल्या कित्येक वर्षापासुन चालुन असुन त्यांच्या सामाजिक कार्याचे व दानत्वाचे करावे तेवढे कौतुक कमी आहे.

# सशक्त राष्ट्रनिर्मितीसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मोठे योगदान - विश्वविक्रमवीर नागेश जोंधळे

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

संघर्षभूमी येथील १४ दिवसीय भीमजयंती महोत्सवात विविध विषयांवर प्रबोधनपर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले आहे. यात ६ एप्रिल रोजी विश्वविक्रमवीर लेखक तथा प्रेरणादायी वक्ते सर नागेश जोंधळे यांचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित असलेला तरूण, समाज आणि देश या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.





## संघर्षभूमी येथील भीमजयंती महोत्सवात प्रबोधनपर व्याख्यान

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारत सातपुते हे होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीस वंदनीय तथागत गौतम बुद्ध यांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करण्यात आले. तसेच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. नंतर सामुहीक वंदना घेण्यात आली. याप्रसंगी बोलतांना सर नागेश जोंधळे म्हणाले की, तरूणांचा देश म्हणून आज जगात भारताची ओळख आहे. शिक्षण घेऊन स्वतः बरोबरच कुटूंबाची व समाजाची जबाबदारी घेणारा तरूण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित आहे. प्रज्ञा, शील व करूणा या मूल्यांचे आचरण करणारा प्रगल्भ समाज त्यांना अपेक्षित आहे. तसेच स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूल्यांना प्रमाण मानणारा देश त्यांना अपेक्षित आहे. सर्वांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे ग्रंथ व भारताचे संविधान यांचे वाचन करावे व त्यातून त्यांचा व्यापक दृष्टीकोन समजून घ्यावा. सशक्त राष्ट्र निर्मितीसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी उल्लेखनीय लढा दिला असेही ते म्हणाले. शेवटी भारत सातपुते यांनी अध्यक्षीय समारोप केला. या कार्यक्रमांमध्येच सात वर्षीय ईश्वरी चोले, सातवीतील आदिश्री बिराजदार व सोहम अंबड यांनी सर नागेश जोंधळे यांच्या मार्गदर्शनात अतिशय प्रभावीपणे सुंदर असे भाषण करून उपस्थितांची मने जिंकली. सोबतच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे प्रा.राहुल सुरवसे, ॲड.दिलीप गोरे , राणी व रूपेश जोगदंड, प्रा.सुनिल वाघमारे, तसेच केवळ दोन महिन्यातच इंग्रजीतील एक लाख वाक्य बोलण्या व लिहिण्याचा विक्रम करणाऱ्या कु.श्रेया पूनम ढोले यांचाही संविधान व पुष्पगुच्छ देऊन गौरव करत जयंती उत्सव समिती व आई सेंटर प्रो तर्फे विशेष सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ.किर्तीराज लोणारे यांनी केले. तर प्रास्ताविक डॉ.गणेश सुर्यवंशी यांनी केले. आर्थिक अहवालाचे वाचन संजय हतागळे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार सुभाष घाडगे यांनी मानले. सरणतंय गाथेने कार्यक्रमाचा समारोप झाला. या कार्यक्रमास ॲड.शाम तांगडे, बलभीम बनसोडे, मुरलीधर कांबळे, विश्वनाथ सावंत, भुजंगराव जोंधळे, प्रमोद सिताप, सागर पोटभरे, डॉ.इंद्रजित भगत, डॉ.मकरंद जोगदंड, राजकुमार साळवी, देवानंद जोगदंड, धम्मानंद वैद्य तसेच द्रुपदाआई सरवदे, जाईआई हिरवे, स्वाती जोंधळे, सविता लोणारे, धम्मप्रिया लोणारे, संजिवनी घाडगे, ज्योती हतागळे, सुमित्रा पोटभरे, डॉ.सुरेखा चव्हाण, रेखा तरकसे, रमा सिताप, आरती भटकर, वंदना जोगदंड, शोभा घोडके, सरस्वती लांडगे, सोनम घोडके आदींची उपस्थिती होती.

पान ६ वरून...

### मराठी पत्रकार परिषदेचे

उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

दर्पण दिनानिमित्त आष्टी तालुक्यातील सर्व जेष्ठ पत्रकार यांना सन्मानित करण्यात आले होते याचं अनुषंगाने मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम एस सर यांनी गेल्या अनेक वर्षांपासून मराठी पत्रकार परिषदेचे राज्यपातळीवर काम करत आहेत व पत्रकारांच्या प्रश्नांनावर आवाज उठवित आहेत आणि आंदोलने व लेखणीच्या माध्यमातून गोर गरीब सर्वसामान्य पत्रकारांना न्याय मिळवून देण्यासाठी अहोरात्र तत्पर असतात व सरकार पर्यंत पत्रकारांच्या व्यथा पोहचविण्याचे काम करत असल्याने त्यांच्या या उत्कृष्ट कार्याची दखल आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने घेण्यात आली आणि मंगळवारी बीड येथे मराठी पत्रकार परिषदेच्या पदाधिकारी यांच्या बैठकीत औचित्य साधून आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम यांनी सन्मानपत्र, शाल, श्रीफळ देऊन मुख्य विश्वस्त एस एम देशमुख सर यांना गौरविण्यात आले.यावेळी जेष्ठ संपादक संपादक अनिल फळे, जेष्ठ संपादक सर्वोत्तम गावरस्कर ,डिजिटल मीडियाचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे, राज्य कार्यकारिणी सदस्य विलास डोळसे,जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर,जिल्हा सरचिटणीस सुभाष सुतार, विभागीय सचिव रवी उबाळे,संजय हंगे, बीड जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, जिल्हा सरचिटणीस सुभाष सुतार, हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरत, जिल्हा उपाध्यक्ष जुनेद बागवान, चंद्रकांत राजहांस,कादर मकरानी,मधुकर तौर, हमिदखान पठाण, प्रचंड सोळंके,अनिल अष्टपुत्रे, पत्रकार सोपान पगारे, मारूती संत्रे आदी पत्रकार बांधवांची उपस्थिती होती.


### पिंपळारुई ग्रामपंचायतीला

मार्गदर्शनाखाली गांवच्या आशा स्वंयसेवीका प्रमिला तोगे, सरफराज शेख, डॉ. सिद्धेश्वर आळणे साहेब सीएच, डॉ. चाटे साहेब, पाठक मॅडम यांनी योग्यरित्य काम पाहिले आहे. यांना बक्षीस वितरण समारंभ कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्यकार्यकारी अधिकारी अदित्य जीवने साहेब, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मोकाटे साहेब, जिल्हा आरोग्य अधिकारी गंडाळ साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कार वितरण करण्यात आले.

# हर घर लायब्ररी-घर घर लायब्ररी पात्रूडच्या विद्यार्थ्यांचा प्रेरणादायी उपक्रम

माजलगाव । प्रतिनिधी

वाचन ही केवळ एक छंद नाही,तर ती व्यक्तिमत्व घडवणारी प्रक्रिया आहे.याच तत्वाला अनुसरून जिल्हा परिषद हायस्कूल पात्रूड येथे '' हर घर लायब्ररी-घर घर लायब्ररी '' हा अभिनव उपक्रम राबवण्यात आला. तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल आणि सोशल मीडियाने मुलांचा बराच वेळ व्यापलेला असत. अशा काळात मुलांना वाचनाकडे पुन्हा वळवण्याचा आणि घराघरात वाचनसंस्कृती रुजवण्याचा हा प्रयत्न खरोखरच कौतुकास्पद आहे.





उपक्रमाची रूपरेषा: या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी आपापल्या घरी अस्ताव्यस्त पडलेल्या पुस्तकांना एकत्र करून,घरात एखाद्या कोपऱ्यात नीटनेटका पुस्तक संग्रह तयार केला. काही विद्यार्थ्यांनी पुस्तकं सुसज्ज रचून आकर्षकपणे लायब्ररीचं रूप दिलं व एक माय लायब्ररीरी साकारली एवढंच नव्हे तर त्यांनी नव्या पुस्तकांची भरही या लायब्ररीत घातली.

विद्यार्थ्यांचा उत्साह: विद्यार्थ्यांनी या उपक्रमात आनंदाने सहभाग घेतला. ते नियमित वाचन करत असून, दर आठवड्याला शाळेत येऊन आपल्या वाचलेल्या पुस्तकावर संवाद साधत आहेत. काही विद्यार्थ्यांनी लहान भावंडांना गोष्टी वाचून दाखवण्यास सुरुवात केली आहे.

पालकांचे योगदान: या उपक्रमाने केवळ विद्यार्थीच नव्हे तर पालकही प्रेरित झाले आहेत. एका पालकाने सांगितले की, ''आमच्या घरी कधीच वाचनाला एवढं महत्त्व मिळालं नव्हतं. आता मुलाच्या वाचनामुळे आम्हीही दररोज काहीतरी वाचतो.''

शेख तय्यब सरांचे विचार: या उपक्रमाची संकल्पना आणि पुढाकार शाळेतील अभ्यासू व प्रेरणादायी शिक्षक शेख तैय्यब सर यांनी घेतली.

''पुस्तक हे प्रत्येक घरात असलेच पाहिजे. लहान वयात वाचनाची गोडी लागली, तर ती मुलं आयुष्यभर ज्ञानाच्या वाटेवर चालतात. घर हेच पहिलं विद्यालय आहे, आणि पुस्तकं त्यातले पहिले शिक्षक!'' असं शेख सरांनी सांगितलं.

शेवटी: '' हर घर लायब्ररी-घर घर लायब्ररी '' हा उपक्रम फक्त पुस्तकांचे प्रदर्शन नसून, तो विचारांची देवाण-घेवाण, ज्ञानवाढ, आणि कौटुंबिक संवाद वाढवण्याचं साधन ठरत आहे. जिल्हा परिषद हायस्कूल, पात्रुड आणि शेख तय्यब सर यांचे हे योगदान इतर शाळांसाठीही एक प्रेरणास्थान ठरू शकते.

पान ६ वरून...

### खाजगी रूग्णालयासारखी

घ्यावी लागेल. कारण, तुम्हाला आत्ता मिळत असलेली स्वस्तातले आरोग्यसेवा बंद करण्याचा डाव या सरकार द्वारे या यंत्रणेद्वारे करण्यात येत आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे आपल्याला स्वस्तात सेवा देणाऱ्या बीएसएनएल या दूरसंचार कंपनीला सरकारने बंद पाडून अंबानी सारख्या लोकांना या क्षेत्रात हुकूमत करायच रेड कार्पेट अंथरूण बीएसएनएल ही शासकीय सेवा कायमची बंद करून टाकली तशीच अवस्था जिल्हा परिषद शाळांची करून या शाळाही खाजगी कंत्राटदारांना देण्याचा घाट घातला आहे. या प्रकरणाच्या निमित्ताने अजून एक प्रश्न पुढे आलेला आहे तो म्हणजे सर्वसामान्य जनतेमध्ये आपले आरोग्या विषयी असलेली बेफिकिरी ज्यामुळे रूग्ण गंभीर अतिगंभीर होईपर्यंत त्याच्या आरोग्याकडे आपण लक्ष देत नाही आणि ज्या वेळेस परिस्थिती हाताबाहेर जाते त्यावेळेस आपण एकदम सजग, सावध, भावनिक होवून रुग्णाला रुग्णालयात घेवून जातो आणि तिथे रुग्ण ताबडतोब बरा व्हावा अशी अपेक्षाही करतो. मात्र बऱ्याच वेळा रूग्णाचे अवस्था अत्यंत गंभीर असल्याने, परिस्थिती हाताबाहेर गेल्याने डॉक्टरांनी केलेलं उपचार व्यर्थ ठरतो आणि रुग्णाच्या जीवावर बेतते. अशावेळी रूग्णाच्या नातेवाईकांच्या संयमाचा बांध फुटून हॉस्पिटलची तोडफोड डॉक्टर्सला मारहाण, कर्मचाऱ्यांना मारहाण असे प्रकार घडतात. यामध्ये नेमका दोष कुणाचा हा प्रश्न महत्त्वाचा आहे. उदाहरणार्थ एखादा पेशंट गेल्या अनेक वर्षांपासून दारू पीत असतो किंवा तंबाखू खात असतो एक दिवस असा येतो की ज्यामध्ये त्याची लिव्हर इतके खराब होते तिथे काम करणे सोडून देते, त्याच्यामध्ये पाणी व्हायला सुरूवात होते आणि मग पोट फुगण्यास सुरूवात होते रुग्णाची परिस्थिती गंभीर बनते आणि तो रूग्ण दवाखान्यामध्ये आणला जातो, ज्याला सिरोसिस ऑफ लिव्हर असं म्हणलं जातं. रूग्ण दवाखान्यात भरती केल्यानंतर रूग्णाच्या नातेवाईकांना तो रूग्ण आता तात्काळ बरा होईल अशी अपेक्षा असते. परंतु, वर्षानुवर्ष पिलेल्या दारूमुळे लीवर उपचाराच्या पलीकडे गेलेले असते. अशावेळी त्या रूग्णाचा अचानक मृत्यू होतो आणि हा धक्का न सहन झाल्याने रूग्ण तर चालत आला होता आणल्यानंतर रूग्ण बोलत होता. परंतु, डॉक्टरांनी रूग्णालयाने उपचारात हलगर्जीपणा केल्याने किंवा एखाद्या चुकीचे इंजेक्शन दिल्याने त्याचा मृत्यू झाला असे सरास म्हणले जाते. परंतु तो रूग्ण वर्षानुवर्षी दारू पीत होता. त्यावेळी त्या रूग्णाला, त्याच्या नातेवाईकालाही दारू पिल्याने लिव्हर खराब होते हे माहीत असूनही तो पितो यावर आधीच प्रतिबंध करावा अस वाटत नाही. यामध्ये दोष कुणाचा तसेच तंबाखू खात असलेल्या रूग्णांना तंबाखूजन्य पदार्थांमुळे तोंडाचा कॅन्सर होतो. हे माहीत असते तरीसुद्धा ते खातच राहतात आणि कॅन्सर झाल्यावर त्याचा त्वरित उपचार व्हावा आणि रूग्ण ठणठणीत बरा व्हावा अशी केलेली अपेक्षा किती संयुक्तिक आहे. याचा विचार प्रत्येकाने मनात करावा. वैद्यकीय शास्त्र हे इतर शास्त्राप्रमाणेच एक अपूर्ण शास्त्र आहे दर दिवशी या शास्त्रात नवीन प्रयोग होत असतात नवीन उपचार पद्धती येत असते. डॉक्टर्स आपल्या परीने या संशोधनाचा अत्याधुनिक उपचार पद्धतीचा समाजाच्या हिताच्या दृष्टीने कसा फायदा करून दिला जाईल याचा विचार करून आपल्या रूग्णाचा उपचार करत असतो. त्याला बरं करण्याचा प्रयत्न करत असतो आणी जगातल्या प्रत्येक डॉक्टरला आपला रूग्ण ठणठणीत बरा व्हावा असच वाटत असते आणि तो यासाठी जीवापाड प्रयत्न करत असतो हे सगळ्यांनी समजून घेण्याची गरज आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेने ही बाब लक्षात ठेवून आपल्या सारासार विचार बुद्धीचा उपयोग करून आपला संयम राखून रुग्णाचा उपचार करून घ्यावा. त्यासाठी डॉक्टर्सला योग्य ते सहकार्य करावे. डॉक्टर्सवर दबाव येऊ नये यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. या निमित्ताने अजून एक प्रश्न पुढे आलेला आहे तो असा की, भारतामध्ये गरीबी आणि आर्थिक चंगळ हा प्रश्न ८० टक्के लोकांकडे आहे त्यामुळे सर्वसामान्य जनतेने आरोग्य विमा कवच घेणे अत्यंत अत्यावश्यक झालेले आहे. परंतु, एका संशोधनामध्ये लोकसंख्येच्या फक्त ३८ टक्के लोकांनी आरोग्य विमा कवच घेतल्याचे सिद्ध झाले आहे. मग एखादी वैद्यकीय अत्यावश्यक परिस्थिती आपल्या घरी ओढवल्यास या आर्थिक प्रश्नाला कसे उत्तर द्यायचे हे गणित त्या परिस्थितीत खूप अवघड होऊन बसते. त्यामुळे प्रत्येकाने आपले आरोग्य ही आपली जबाबदारी हे ओळखून घेऊन वेळीच आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे तसेच वेळीच आरोग्य विमा कवच काढणे गरजेचे आहे. या निमित्ताने दीनानाथ मंगेशकर रूग्णालयावर आगपाखड करणाऱ्या, आंदोलने करणाऱ्या विविध पक्षांच्या नेत्यांची, पुढार्यांचे किती नातेवाईक शासकीय रूग्णालयामध्ये आरोग्य सेवा घेण्यासाठी जातात हा ही एक मोठा संशोधनाचा विषय आहे आणि जर ते जात नसतील मग या आंदोलनकर्त्यांनी या शासनाला हा प्रश्न विचारला पाहिजे की खाजगी रूग्णालयासारखी तोडीची शासकीय रूग्णालय तुम्ही कधी निर्माण करणार आहात ज्याद्वारे सर्वसामान्य लोकांना आरोग्य सेवा ही त्यांच्या परवडणाऱ्या दरात असेल..? आपल्याला परवडणाऱ्या दरात आरोग्य सेवा मिळणे हा रूग्णाचा तथा सर्वसामान्य जनतेचा जसा हक्क आहे तसेच ही आरोग्यसेवा शासनातर्फे उपलब्ध करून देणे हा शासनाचे परम कर्तव्य आहे. हे परम कर्तव्य शासन स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षे पूर्ण झाली तरी सुद्धा देऊ शकत नाही हे या शासनाचे अपयश आहे. या अपयशाला झाकण्यासाठी असे प्रकरण घडल्यानंतर तात्पुरती मलमपट्टी करण्यासाठी त्या रूग्णालयाच्या नावाने ओरड करायची, खाजगी रूग्णालयाच्या नांवाने बोंब मारायची, एखाद्या दुसरया डॉक्टरवर कार्यवाही करायची मात्र त्याच वेळेस शासनाची स्वतःची आरोग्य व्यवस्था त्याचे किती दयनीय हाल झाले आहेत, सर्वसामान्य जनतेचा शासकीय रुग्णालयांवर विश्वास राहिला नाही आणि आपल्या फायद्यासाठी हे आरोग्य व्यवस्था धनदांडग्या लोकांच्या हाती देऊन लोकांच्या नांवाने चांगभलं असं म्हणत वड्याचे तेल वांग्यावर असं म्हटल्याप्रमाणे हे शासन वागत आहे. याचाही कुठेतरी उपचार झाला पाहिजे आणि सलाईनवर असलेले शासकीय दवाखाने दर्जेदार करण्यावर भर दिला पाहिजे असे वाटते. ही बातमी लिहिपर्यंत अजून एक बातमी आली की, रामनवमीच्या निमित्त शिर्डीत ५१ भिक्षेकरी आढळले. त्यापैकी १३ जणांची प्रकृती बिघडल्याने त्यांना अहमदनगरच्या जिल्हा रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यापैकी ४ जण मृत्युमुखी पडले. ही अवस्था शासकीय रूग्णालयांची आहे. त्यामुळे शासनाने आपल्या आरोग्य यंत्रणेकडे लक्ष देणे आवश्यक आहे असे वाटते.

### रमाई आवास घरकुल योजने अंतर्गत

असल्याने पाटोदा शहरातील गरजू आणि गरिबांच्या घरकुलाचा प्रश्न मार्गी लागल्याने पाटोदा शहरातील समाजाच्या वतीने सभापती किशोर अडागळे यांनी आमदार सुरेश आण्णा धस यांचे आभार व्यक्त करत म्हटले की, ''आमदार सुरेश धस यांच्या अथक परिश्रमामुळे आज पाटोदा शहरातील दलित समाजासह इतर समाजातील अनेक कुटुंबांना एक छत मिळवण्याची संधी मिळाली आहे. यामुळे समाजातील अनेक कुटुंबांची जीवनमान सुधारेल. ''आमदार सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली पाटोदा नगरपंचायत नगराध्यक्ष तसेच उपाध्यक्ष, सभापती सर्व नगरसेवक पाटोदा शहराच्या विकासासाठी नेहमीच कार्य करत आहे आणि हे घरकुल प्रकल्प देखील त्यांचाच एक भाग आहे. त्यांच्यामुळेच पाटोदा शहरातील चर्मकार समाजाला एका उज्वल भविष्याची आशा निर्माण झाली आहे.'' असे देखील सांगितले असुन रमाई आवास घरकुल योजने अंतर्गत पाटोदा शहरात २१० ऐवडे मोठ्या प्रमाणात घरकुल मंजूर करून आणल्याबद्दल कार्यसम्राट विकासभू आमदार सुरेश आण्णा धस यांचे समाजाच्या वतीने जाहीर आभार यांनी मानले.

### गंभीर गुन्ह्यातील

सकाळी १०:०० वाजे पर्यंत धमक्या दिल्या आहेत म्हणुन नाझी वरील तीघां विरुध्द तकार आहे.या तक्रारीवरुन माजलगाव शहर पोलीस ठाण्यात परवेझ पाशा शेख,रा.फुलेनगर माजलगाव,याचे वडील नामे शेख पाशा मनियार व भाऊ नामे शेख शोयब पाशा मनियार,शेख शेहबाज पाशा मनियार यांच्या विरोधात एन.सी.आर.क्रं ०१५२/२०२५,कलम ३५१(२) अन्वये दाखल करण्यात आली असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# टोमॅटोचे भाव पडल्याने शेतकरी अडचणीत

## सरासरी आठ रूपयांचा भाव मिळाल्याने उत्पादन खर्चही वसूल होईना

पुणे : सध्या बाजारात टोमॅटोला कवडीमोल भाव मिळत आहे. प्रति किलोला दहा रुपये भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघत नसल्याचे दिसत आहे. टोमॅटोची आवक वाढली असून मागणी कमी राहिल्याने टोमॅटोचे भाव घसरत आहे. गेल्या वर्षी जुलै महिन्यात प्रति किलोला ८० ते १०० रुपयांवर गेलेला टोमॅटो यावर्षी फक्त सहा ते दहा रुपये प्रति किलोने विकला जात आहे. ही भावातील मोठी घसरण आहे.

काही भागांत शेतकऱ्यावर अक्षरशः टोमॅटो जनावरांपुढे टाकण्याची तसेच बाजारात विक्री न झाल्याने फेकून देण्याची वेळ आली आहे. बाजारात टोमॅटो विक्रीविना पडून राहत आहे हे भयानक वास्तव आहे. खेड तालुक्यातील चाकण येथील महात्मा फुले बाजारात टोमॅटो स्थानिक परिसरातून तसेच नगर, नाशिक, लातूर जिल्ह्यांतून विक्रीसाठी येत आहे. सुमारे पन्नास टनांवर टोमॅटोची मोठी



आवक होत आहे. ऐन उन्हाळ्यात पाण्याची टंचाई असताना शेतीपिकाला कसेबसे पाणी देऊन शेतकरी शेतीमाल पिकवतो आहे. त्यात भाव न मिळाल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. भाव घसरल्याने मोठे आर्थिक नुकसान होत आहे. टोमॅटो हे पीक शेतकऱ्यांना कधी मालामाल तर कधी उद्ध्वस्त करणारे बेभरवशाचे पीक झाले आहे. शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन शेतीमालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांकडे वळणे गरजेचे आहे. सरकारने यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

उत्पादन खर्चही अधिक

टोमॅटो पिकाचा उत्पादन खर्चही अधिक आहे. टोमॅटो पीक घेण्यासाठी मशागत, शेणखत, रासायनिक खते टाकणे, बेड वाफे तयार करणे, मल्चिंग पेपर, कीटकनाशकांची फवारणी करणे, रोपांची दोरीने बांधणी करणे, उन्हापासून संरक्षणासाठी कापडी आच्छादन करणे आदी कामे टोमॅटो उत्पादन घेताना शेतकऱ्याला करावी लागतात. टोमॅटो पिकाला एकरी साधारणपणे पन्नास हजार रुपये खर्च येतो. मजुरांचा खर्चही दिवसेंदिवस वाढतो आहे.

## जमिनीसाठी गंधकाची कमतरता ओळखा

गंधक पिकातील हरितद्रव्यनिर्मितीची आणि प्रकाश संश्लेषणाची प्रक्रिया वाढविण्यास मदत करते याशिवाय गंधक बीज निर्मिती प्रक्रियेमध्ये मदत करते. उच्च प्रतीच्या शेतमालाची निर्मिती होण्याकरिता मदत करते. वनस्पतीमधील पाण्याचा ताण सहन करण्याची क्षमता वाढविते. पिकामध्ये गंधक कमतरतेची लक्षणे साधारणतः पिकाच्या काढणीच्या अवस्थेत दिसून येतात. त्यामुळे जमिनीतील गंधकाची कमतरता ओळखून पुढील हंगामातील पिकांच्या चांगल्या उत्पादनासाठी प्रयत्न करता येतात.

जमिनीमध्ये गंधक कमतरतेची कारणे : मातीच्या ऱ्हासामुळे आणि निचऱ्यामुळे जमिनीतील गंधकाचे प्रमाण घटते.

गंधकविरहित किंवा गंधकाचे प्रमाण अतिशय कमी असलेल्या खतांचा वापर केल्यामुळे जमिनीतील गंधकाचे प्रमाण कमी होते. शेतातील पिकांचे अवशेष, सेंद्रिय खते आणि काडी कचरा जमिनीतच न कुजवल्यामुळेही जमिनीत गंधकाची कमतरता दिसून येते.

पिकातील गंधक कमतरतेची लक्षणे : कडधान्य वर्गीय पिकाच्या मुळावर असणाऱ्या नत्र स्थीरीकरण करणाऱ्या गाठीच्या संखेत घट होते. त्यामुळे नत्र स्थीरीकरणाचे प्रमाण कमी होते. फळे पूर्णपणे परिपक्व होत नाहीत. पिकांमध्ये प्रकाश संश्लेषणाची क्रिया आणि हरित द्रव्याची निर्मिती मंदावलेली दिसते. रुंद पाने असलेली पिकाची पाने चुरडलेली दिसतात. गळित धान्यातील दाण्याचा आकार, तजेलदारपणा त्यातील तेलाचं प्रमाण कमी झालेलं दिसते. फळातील एकूण विद्राव्य घनपदार्थांचं प्रमाण कमी होतं आणि नत्र देऊनही हिरवी होत नाहीत.

पीक व्यवस्थापन करताना मुख्यतः नत्र, स्फुरद व पालाश या अन्नद्रव्यांचा वापर केला जातो. त्यामुळे उर्वरित अन्नद्रव्यांची कमतरता वाढत जाते. अलीकडे जमिनीत गंधकाची कमतरता जाणवू लागली आहे. गंधक मातीचा सामू कमी करण्याचं काम करतो. त्यामुळे चुनखडीयुक्त चोपण जमिनीमध्ये त्याचा वापर अत्यंत महत्त्वाचा ठरतो. गंधक हे पिकाच्या वाढीसाठी दुय्यम अन्नघटक असला तरी. संशोधनावरून गंधक वनस्पतीच्या वाढीसाठी मुख्य अन्नद्रव्य गणले जाऊ लागले आहे. त्यामुळे आपल्या जमिनीतील गंधकाची कमतरता ओळखून वेळेवर उपाय करणे गरजेचे आहे.



## अवकाळी पावसात पिकांची काळजी

वादळीवाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा तसेच गारपीटीचा अंदाज लक्षात घेता, पिकांची कशी काळजी घ्यावी याविषयीचा कृषी सल्ला तज्ज्ञांकडून दिला जात आहे.

वादळीवाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा तसेच गारपीटीचा अंदाज लक्षात घेता, मळणी केलेल्या मालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. मळणी केलेला माल पावसात भिजणार नाही याची दक्षता घ्यावी.

गहू : वादळीवाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा तसेच गारपीटीचा अंदाज लक्षात घेता, मळणी न केलेल्या व मळणीस तयार असलेल्या गहू पिकाची लवकरात लवकर मळणी करावी. मळणी करणे शक्य नसल्यास काढणी केलेला माल ताडपत्रीने झाकून ठेवावा. मळणी केलेला माल पावसात भिजणार नाही याची दक्षता घ्यावी.

हळद : सध्या हळदीची काढणी सुरु आहे. काढणी केलेल्या हळदीची उघड्यावर साठवण करू नये. काढणी केलेल्या मालाची सुरक्षित ठिकाणी (गोदामात) साठवणूक करावी.

उन्हाळी भुईमूग : उन्हाळी भुईमूग पिकात आवश्यकतेनुसार तुषार सिंचन पध्दतीने पाणी व्यवस्थापन करावे. उन्हाळी भुईमुग पिकात रसशोषण करणाऱ्या (मावा, तुडतुडे, फुलकीडे व पांढरी माशी) किडींना आकर्षित करण्यासाठी एकरी १० ते १२ पिवळे व निळे चिकट सापळे लावावेत व तंबाखुवरील पाने खाणाऱ्या अळीचे व लाल केसाळ अळीचे समुहातील



अंडी लहान अळ्या हाताने वेचून नष्ट कराव्यात. उन्हाळी भुईमूग पिकात रसशोषण करणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ५% निंबोळी अर्काची किंवा ॲझाडिरेक्टिन (३० पीपीएम) ३ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप बघून फवारणी करावी.

केळी : वादळीवाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा तसेच गारपीटीचा अंदाज लक्षात घेता, घड लागलेल्या केळी झाडांना काठीने आधार द्यावा. काढणीस तयार असलेल्या केळीच्या घडांची काढणी लवकरात लवकर करून घ्यावी. केळी बागेस आवश्यकतेनुसार सरी वरंब्याने पाणी द्यावे. जमिनीतील ओलावा टिकून राहण्यासाठी व जमिनीचे तापमान संतुलित राहण्यासाठी केळी फळझाडाच्या आळयात आच्छादन करावे. नविन लागवड केलेल्या केळीच्या रोपांचे उन्हापासून संरक्षण करण्यासाठी रोपांना सावली करावी.

आंबा : काढणीस तयार असलेल्या आंबा फळांची काढणी लवकरात लवकर करून घ्यावी. आंबा बागेत आवश्यकतेनुसार पाणी व्यवस्थापन करावे. जमिनीतील ओलावा टिकून राहण्यासाठी व जमिनीचे तापमान संतुलित राहण्यासाठी आंबा फळझाडाच्या आळयात आच्छादन करावे. नविन लागवड केलेल्या आंब्याच्या रोपांचे उन्हापासून संरक्षण करण्यासाठी रोपांना सावली करावी. आंबा बागेत ००:००:५० १५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप बघून फवारणी करावी.

# जमिनीची नांगरट कधी आणि कशी करावी

नांगरटीचे उद्देश साध्य होण्यासाठी, पूर्वीचे पीक काढल्याबरोबर लगेच नांगरट करणे फायद्याचे ठरते. कारण यावेळी जमिनीत ओलावा असल्याने नांगरटीचे काम हलके होते, ढेकळे निघत नाहीत, नांगरट खोलवर होते, पूर्वीच्या पिकाचा पालापाचोळा, काडीकचरा जमिनीत गाडला जातो व जमिनीस सेंद्रिय पदार्थाचा पुरवठा होतो. रब्बी-उन्हाळी व हंगामातील पिके काढल्यानंतर म्हणजेच सर्वसाधारणपणे मार्चएप्रिल मध्ये त्वरित नांगरण्या कराव्यात. हलक्या जमिनी पीक काढण्याच्या वेळी घट्ट होतात म्हणून एप्रिल किंवा मे महिन्यात वळवाचा पाऊस पडल्यानंतर किंवा पावसाळ्याच्या सुरवातीला पहिला पाऊस पडल्यानंतरच नांगराव्यात.



जमिनीची नांगरट कशी किती खोल करावी : नांगरट नेहमी उतारास आडवी करावी. नांगराचे तास उतारास आडवे असल्याने पाणी सावकाश थबकत उताराच्या दिशेने पुढे जाते. त्यामुळे जमिनीत अधिक पाणी मुरायला वेळ मिळतो. येथे काही प्रमाणात पाणी अडवा पाणी जिरवा ही उक्ती साध्य होते. पाण्याच्या प्रवाहाचा वेग मंदावल्याने मातीचे बारीक कण सहजासहजी पाण्याबरोबर वाहून जात नाहीत.अवकाळी आणि वळवाच्या पावसाने होणारी जमिनीची धूप कमी होण्यास मदत होते.

जमिनीची नांगरट ही प्रामुख्याने जमिनीचा प्रकार,जमिनीचा उतार, तणांचा प्रकार व प्रादुर्भाव, स्थानिक हवामान ,पुढील हंगामात म्हणजे खरीप-रब्बीत घ्यावयाची पिके या सर्व गोष्टींचा विचार करूनच नांगरट किती खोल करावी हे ठरवावे. खोल जाणाऱ्या पिकांच्या मुळ्या करीता खोल नांगरट व उथळ मुळ्यांच्या पिकांसाठी उथळ नांगरणी करणे जरुरीचे आहे. शिवाय प्रत्येक वर्षी शेतजमीन एकाच खोलीवर नांगरू नये,कारण त्यामुळे ठराविक खोलीवर एक टणक असा घट्ट थर तयार होतो,त्याला तवा धरणे असे म्हणतात.तो तवा फोडला नाही तर पिकाच्या मुळ्या , त्या थरात शिरकाव करत नाहीत अशा थरातून पाणी मुरण्यास आणि निचरा होण्यास वेळ लागतो. हंगामात घ्यावयाच्या पिकानुसार, नांगरटीची खोली ठरवावी. सर्वसाधारणपणे ऊस, बटाटा, आले, भाजीपाला इत्यांदी बागायती पिकांसाठी जमिनीची १५ ते २० से.मी खोल नांगरट करणे आवश्यक आहे, ज्वारी, बाजरी, गहू, भुईमुग या पिकांसाठी जमिन १० ते १५ से.मी. खोल नांगरावी

प्रत्येक जमिनीची दर वर्षी नांगरट करावी असे नाही .आपल्या जमिनीच्या आणि आपण घेणाऱ्या पिकाच्या गरजेनुसार ही मशागत करण्याची गरज आहे ,त्याकरिता त्या जमिनीवरील मागील पीक ,पुढे घ्यावयाचे पीक ,जमिनीचा प्रकार आणि हवामान इत्यादीवर अवलंबून असते. ज्या जमिनीत हरळी,कुंदा वा लव्हाळा यासारख्या खोल मुळे असलेल्या तणांचा उपद्रव नसेल त्या ठिकाणी दर तीन वर्षांनी एकदा नांगरट करावी.तूर,कापूस ,सूर्यफूल यासारख्या पिकांच्या मुळ्या ,धसकटे जमिनीत खोलवर गेल्याने कुळवाच्या पाळीने निघणे शक्य होत नाही अशा ठिकाणी नांगरट अत्यावश्यक ठरते.

कोरडवाहू क्षेत्रातील जमिनीची नांगरट केंव्हा करावी ?: कोरडवाहू भागातील जमिनी ह्या काळ्या आणि भारी असून बेसाल्ट या अग्निजन्य खडकापासून बनलेल्या आहेत.अशा जमिनीत चिकणमातीचे प्रमाण ६० टक्क्यापेक्षा जास्त असते ,तसेच जमिनीची खोली ६० ते ९० से.मी. पर्यंत असते. या जमिनीतील ओल कमी होताच,मोठ्या प्रमाणावर त्यास भेगा पडतात आणि कठीण बनतात.या जमिनीची नांगरट प्रत्येक वर्षी केल्याने जमिनीच्या कण रचनेवर विपरीत परिणाम होतो.जमिन प्रमाणापेक्षा जास्त पोकळ राहते.ज्वारी, बाजरी यासारख्या लहान आकाराच्या बियाणे असणाऱ्या पिकांची उगवण शक्ती होत नाही. कारण बी, माती आणि पाणी यांचा संपर्क तसेच जमिनीतील ओलावा आणि तापमानाचा एकत्रित परिणाम उगवण शक्तीवर होतो,म्हणून अशा भारी काळ्या जमिनीची तीन वर्षातून एकदाच नांगरट करावी.

हलक्या जमिनीची नांगरट : हलक्या म्हणजे २५ ते ३० से,मी आणि तांबड्या जमिनी मध्ये खोल नांगरट फायद्याची दिसून येते .कारण जमिनीच्या खालच्या थरातील कठीणपणा कमी केला जातो ,त्यामुळे जमिनीत पाणी मुरण्याचा वेग वाढविला जातो आणि जमिनीत जास्त प्रमाणात पाणी मुरते .हलक्या जमिनी पीक काढण्याच्या वेळी घट्ट होतात म्हणून एप्रिल किंवा मे महिन्यात वळवाचा पाऊस पडल्यानंतर किंवा पावसाळ्याच्या सुरवातीला पहिला पाऊस पडल्यानंतरच नांगराव्यात.




## जागतिक दिवस: 'जागतिक कोंकणी भाषा दिन'

### महत्वाच्या घटना

१८७५ : महर्षी स्वामी दयानंद यांनी आर्य समाजाची स्थापना केली.
१८८९ : भारतीय कलाविष्कार,जिम्नॅस्ट, बलूनिस्ट, पॅराशूटिस्ट आणि देशभक्त रामचंद्र चटर्जी गरम फुग्यातुन उड्डाण करणारे तसचं, पॅराशूटमध्ये उतरणारे पहिले भारतीय नागरिक ठरले.
१९१२ : इंग्लंडमधील साऊथॅम्प्टन बंदरातुन 'टायटॅनिक' जहाजाचे पहिल्या (व शेवटच्या) सफरीवर प्रयाण.
१९१७ : गांधी चंपारण्याला आगमन
१९५५ : योहान साल्क या शास्त्रज्ञाने सर्वप्रथम पोलिओ लशीची यशस्वी चाचणी केली.
१९७० : पॉल मेकार्टनीने व्यक्तिगत आणि व्यावसायिक कारणास्तव द बीटल्स सोडण्याचे जाहीर केले.
१९८२ : भारताचा पहिला उपग्रह इन्सॅट वन याचे अंतराळात उड्डाण.
२००१ : भारत व इराण या दोन देश दरम्यान तेहरान घोषणा पात्रांवर हस्ताक्षर करण्यात आले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७५५ : डॉ. सामुएल हानेमान, होमिओपॅथीचे जनक.
१८४३ : रामचंद्र भिकाजी गुंजीकर - 'मोचनगड' या मराठीतील पहिल्या ऐतिहासिक कादंबरीचे लेखक आणि 'विविध ज्ञानविस्तार' मासिकाचे संपादक (मृत्यू: १८ जून १९०१)
१८४७ : जोसेफ पुलित्झर - हंगेरीयन-अमेरिकन राजकीय नेते आणि प्रकाशक, वृत्तपत्र क्षेत्रात विशेष कामगिरी बजावणार्यांना देण्यात येणार्या पुलित्झर पुरस्कारांचे प्रवर्तक (मृत्यू: २९ आक्टोबर १९११)
१८८० : सर सी. वाय. चिंतामणी - स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रागतिक पक्षाचे नेते व श्रेष्ठ वृत्तपत्रकार, पहिल्या गोलमेज परिषदेचे विशेष अतिथी, उत्तरप्रदेशचे शिक्षणमंत्री (मृत्यू: १ जुलै १९४१)
१८९४ : घनश्यामदास बिर्ला - व्यापारी पार्श्वभूमीतून पुढे येऊन पुढे प्रचंड औद्योगिक साम्राज्य उभारलेले उद्योगपती (मृत्यू: ११ जून १९८३)
१८९७ : भारतीय लेखापाल आणि राजकारणी प्रफुल्लचंद्र सेन यांचा जन्म. (मृत्यू: २५ सप्टेंबर १९९०)
१९०१ : डॉ. धनंजय रामचंद्र तथा द. रा. गाडगीळ - अर्थशास्त्रज्ञ, भारतीय अर्थशास्त्राचे प्रणेते, सहकारी चळवळीचे खंदे समर्थक, पुणे विद्यापीठाचे कुलगुरु (मृत्यू: ३ मे १९७१)
१९०७ : मोतीराम गजानन तथा मो. ग. रांगणेकर - नाटककार, चित्रपट दिग्दर्शक व पत्रकार (मृत्यू: १ फेब्रुवारी १९९५)
१९१७ : भारतीय राजकारणी जगजितसिंह लयलपुरी यांचा जन्म. (मृत्यू: २७ मे २०१३)
१९२७ : मनाली कल्लट तथा एम. के. वैणू बाप्पा - भारतीय खगोलशास्त्रज्ञ. तार्यांची प्रत आणि त्यांच्या वर्णपटातील परस्परसंबंधांची उकल केली. (मृत्यू: १० ऑगस्ट १९८२)
१९२८ : परमवीर चक्र सन्मानित भारतीय सैन्य दलाचे माजी लेफ्टनंट कर्नल धनसिंग थापा यांचा जन्मदिन.
१९३१ : किशोरी आमोणकर - शास्त्रीय गायिका
१९३५ : भारतीय जयपूर घराण्याच्या शास्त्रीय गायीका, शास्त्रीय शैली ख्याल आणि हलकी शास्त्रीय शैली ठुमरी आणि भजन गानसम्राज्ञी किशोरी रवींद्र आमोणकर यांचा जन्मदिन.
१९५२ : भारतीय राजकारणी नारायण राणे यांचा जन्म.
१९७२ : स्काईप चे सहसंस्थापक प्रेसिंड कासासुलु यांचा जन्म.
१९७५ : भारतीय नर्तक आणि कोरिओग्राफर टेरेंस लुईस यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३१७ : संत गोरा कुंभार.
१६७८ : थोर विदुषी वेणाबाई -रामदासस्वामींची मानसकन्या, प्रवचनकार .
१८१३ : जोसेफ लाग्रांगे - इटालियन गणितज्ञ (जन्म: २५ जानेवारी १७३६)
१९३१ : खलील जिब्रान - लेबनॉनमधे जन्मलेले अमेरिकन कवी, लेखक व कलाकार (जन्म: ६ जानेवारी १८८३)
१९३७ : डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर - ज्ञानकोशकार. 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' हे त्यांचे सर्वात महत्त्वाचे कार्य होय. (जन्म: २ फेब्रुवारी १८८४ रायपूर, मध्य प्रदेश)
१९४९ : बिरबल सहानी - पुरावनस्पती शास्त्रज्ञ, राष्ट्रीय विज्ञान अकादमीचे अध्यक्ष (जन्म: १४ नोव्हेंबर १८९१ सहारणपूर, उत्तर प्रदेश)
१९६५ : डॉ. पंजाबराव देशमुख - स्वतंत्र भारताचे पहिले कृषी मंत्री, विदर्भात त्यांनी केलेले शिक्षणप्रसाराचे कार्य कर्मवीर भाऊराव पाटलांच्या तोडीचे मानले जाते. (जन्म: २७ डिसेंबर १८९८)
१९९५ : मोरारजी देसाई - भारताचे ४ थे पंतप्रधान, स्वातंत्र्यसेनानी व गांधीवादी नेते, 'भारतरत्न' (जन्म: २९ फेब्रुवारी १८९६)
२००० : डॉ. श्रीधर भास्कर तथा 'दादासाहेब' वर्णेकर - संस्कृत पंडित (जन्म: ३१ जुलै १९१८).

# तप्त लोखंडाला आकार देणाऱ्या घिसाडी समाजाला स्वत:च्या आयुष्याला आकार देता येत नाही

## घण लोखंडावर अन् काळजावर सुद्धा; विलास पडुळकर घिसाडी कुटुंबाची कथा आणि व्यथा

लिंबागणेश। प्रतिनिधी

रखरखत्या उन्हात बाहेरचं ऊन आणि भट्टीची उष्णता मिळुन उष्णतेची जबर झळ सोसुन वजनदार घण मारून तप्त लोखंडाला आकार देण्याचे काम करणाऱ्या घिसाडी समाजातील लोकांना स्वतःच्या आयुष्याला मात्र आकार देता येत नाही.सध्या बीड तालुक्यातील लिंबागणेश या गावी रस्त्याच्या कडेला पिक अप मध्ये अख्खा संसार थाटुन बायको आणि ३ मुलांसह रखरखत्या उन्हात शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारी आणि घरगुती उपयोगाची लोखंडाची हत्यारे अवजारे बनविणे हा यांचा परंपरागत व्यवसाय. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यातील भराडी गावचे विलास कैलास पडुळकर, पत्नी रेणुका, शिवाजी,शिवम आणि कोमल नावाची ३ मुलं. पोटापाण्यासाठी ग्रामीण भागात गावोगावी मुक्काम दर मुक्काम करत पोटाची भुक भागवाण्यासाठी धडपड.

ग्रामीण महाराष्ट्रात घिसाडी समाजातील पारंपारिक व्यवसायात पुरूषांपेक्षा जास्तीचे योगदान महिलांचे.त्यासाठी भट्टी लावणे,तप्त



लाल लोखंडावर गरजेप्रमाणे ७ ते १५ किलो वजनाचे घण मारणे.,ग्रांईडर मशिन नसल्याने काणसीने हत्यारे घासणे,बनवलेली अवजारे आसपासच्या गावातील आठवडी बाजारात जाऊन विकणे हि कामे प्रामुख्याने महिलाच करतात.

शिवाय सगळी घरगुती कामे, मुलांना सांभाळणे हि कामे महिलांनाच करावी लागत असल्याचे रेणुका पडुळकर यांनी सांगितले. सांडपाण्याची व्यवस्था नाही.झोपडीशेजारीच गोलाकार खड्डा करून त्यातच कपडे -भांडी धुण्याचे पाणी, शिवाय मुलाबाळांसाठी आंघोळीसाठी पाणी साठवायचे.शौचालयाची सोय नसल्याने पहाटेच उठून या महिलांना शौचासाठी दुर उघड्यावर जावे लागते.

विलास पडुळकर सांगतात त्यांना ३ मुलं दोन मोठे मुलगे शिवाजी आणि शिवम तर धाकटी मुलगी कोमल. यांच्या सोबतच असतात. परंपरागत हाच पोटापाण्याचा धंदा, शिकुन सवरून कामधंद्याला लागल्याचं त्यांच्या पाहण्यात नसल्याने शिक्षणाचे महत्त्व नसल्याने शिक्षणावाचुन काही अडत नाही.शाळा शिकलेल्यांना शिक्षणाचा फायदा झालाय,नोक-या लागल्यात असं त्यांच्या ऐकण्यात सुद्धा नाही. घिसाडी जमातीचे लोक प्राचीन काळी राजपूत सैन्यात ढाली तलवारी तयार करणारे कारागीर,तलवारींना धार लावण्याचे काम करायचे आणि त्यांच्या सोबत युद्धभूमीवर सोबत रहायचे.महाराणा प्रतापसिंहाचे आम्ही वंशज असल्याचे ते अभिमानाने सांगतात.

## महिलांच्या कलागुणांना मिळाली संधी

### जयभिम महोत्सवात विविध स्पर्धा उत्साहात



बीड । प्रतिनिधी

येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे, मंगळवार (दि.८) रोजी महिलांच्या विविध स्पर्धा पार पडल्या.त्या स्पर्धांना महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला होता.

बीड येथील सामाजिक न्याय भवन येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने ४ ते १४ एप्रिल या कालावधीत जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने या जयभिम महोत्सवात महिलांच्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. त्यामध्ये महापुरुष वेशभूषा, रांगोळी, संगीत खुर्ची आदी स्पर्धा उत्साहात पार पडल्या. महिला स्पर्धा समितीच्या प्रमुख तथा आयोजक अरुणाताई आठवले यांच्या उपस्थितीत सदरील स्पर्धा पार पडलेल्या आहेत. यावेळी विचार मंचावर अध्यक्ष म्हणून शैलजा ओव्हाळ, प्रमुख पाहुणे दीपा रोडे, मायाताई मिसळे, संगीता वाघमारे आदींची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक माया तेलंग, सूत्रसंचालन प्रा.पांडुरंग सुतार, आभार वैशाली चपोडे-जोगदंड यांनी केले. दरम्यान जयभिम महोत्सवात साजऱ्या होणाऱ्या कार्यक्रमांना जनतेने उपस्थित राहावे. असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांनी केले आहे.

## थोडक्यात



### श्रीक्षेत्र भगवानगड विकासासाठी ६७ लाख रुपयांची देणगी

जालना : भगवान बाबा गडा विकासासाठी घनसावंगी तालुक्यातील रामगव्हाणकरांनी ६७ लाखांची देणगी जमा करून भगवान गडाचे महंत डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांच्याकडे सुपूर्द केली आहे. श्रीक्षेत्र भगवानगडाच्या विकासासाठी रामगव्हाण येथील भाविकांनी ६७लाखांची देणगी जमा केली आहे. ग्रामस्थांनी गडाचे महंत डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांच्याकडे ही रक्कम सुपूर्द केली. अवघ्या १०० उंबऱ्यांच्या गावाने इतकी मोठी देणगी दिली आहे. भगवानगडावर होणाऱ्या माउलींच्या मंदिरासाठी हा निधी देण्यात आला आहे. यात सर्व जाती-धर्मांच्या लोकांनी सहभाग घेतला आहे. भगवानगडाचे महंत डॉ. नामदेव शास्त्री महाराज

रामगव्हाण येथे अखंड हरिनाम सप्ताह सांगतेसाठी आले होते. या वेळी त्यांची मिरवणूक काढण्यात आली. रामगव्हाण गावात आगमनापूर्वी वडीगोद्री येथे आतषबाजी करून फुलांचा वर्षाव करत शाल व हार घालून महंत डॉ. नामदेव शास्त्री यांचे स्वागत करण्यात आले. डॉ. शास्त्री यांनी गडावरील विकासाबाबत तसेच ज्ञानेश्वर माउली मंदिराच्या बांधकामाबाबत माहिती दिली. तसेच गावकऱ्यांसोबत यथोचित संवाद साधला. या वेळी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जिल्हा परिषदेच्या आरोग्य कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन दोन महिन्यापासून रखडले

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सर्व आरोग्य विभागातील कंत्राटी प्राथमिक आरोग्य केंद्र कर्मचारी यांचे माहे फेब्रुवारी व मार्च वेतन तात्काळ अदा करण्यात यावे यासाठी निवेदन श्री आदित्य जीवने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना देण्यात आले असून आरोग्य विभाग प्राथमिक आरोग्य केंद्र कंत्राटी कर्मचारी यांचे वेतन दोन महिन्यापासून झालेले नसून व ईपीएफ हे गेले.

सात-आठ महिन्यापासून खात्यावर जमा झालेले नाही. मार्च महिना संपला परंतु कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधन अद्यापही अदा करण्यात आले नाही. त्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती आणि इतर सण साजरे करणे कठीण झाले आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र कर्मचाऱ्यांना वेतन आणि ईपीएफ अद्यापही मिळाले नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. गुढीपाडवा,ईद आणि होळीचा सण आर्थिक संकटात गेला असून आता डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पार्श्वभूमीवर लवकरात लवकर थकित असलेले वेतन व ईपीएफ अदा करण्यात यावे.

## डॉ. विठ्ठल जाधव यांच्या कवितासंग्रहास पुरस्कार

शिरूर । प्रतिनिधी

येथील साहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव यांच्या 'अटर का पटर' या बालकविता संग्रहाला पंढरपूर येथे ज्ञानवर्धिनी राज्यस्तरीय बालसाहित्य पुरस्कार दि. १ एप्रिल रोजी प्रदान करण्यात आला. शिक्षक आ. दत्तात्रय सावंत, जेष्ठ साहित्यिक हरिश्चंद्र पाटील, आयुर्वेदाचार्य बाबुशेठ पांडकर, राजेश पवार, विठ्ठल सहकारी कारखान्याचे धनंजय काळे, समाधान गाजरे यांचे हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. बालमनाचे कांगोरे विस्तारणाऱ्या या कवितासंग्रहात राष्ट्रभक्ती, पशूपक्षी, निसर्गपर कविता असून बालविश्व कवितेतून साकारले आहे. कविता संग्रहाची निर्मिती इसाप प्रकाशन नांदेडचे



दत्ता डांगे यांनी तर प्रसिद्ध चित्रकार शीतल शहाणे यांनी चित्र रेखाटले आहेत. पुरस्कार वितरण प्रसंगी अरविंद पवार, हेमंत पवार, अमोल चव्हाण, संजीवनी जाधव यांची उपस्थिती होती. सुत्रसंचलन साहित्यिक अंकुश गाजरे यांनी केले तर आभार प्रकाश गाजरे यांनी मानले.

## विद्रोही ऊर्जेचा रंगला काव्योत्सव !

### कविता परिवर्तनाच्या कार्यक्रमाने रसिक मंत्रमुग्ध



बीड। प्रतिनिधी

अवघ्या राज्यात आदर्श ठरलेल्या बीडच्या जयभीम महोत्सवात बुधवार (दि.९) कविता विद्रोही परिवर्तनाच्या हा कार्यक्रम पार पडला. प्रत्येक कवींनी आंबेडकरी चळवळींचा ठाव घेणार्या व चळवळींना बळ देणार्या परिवर्तनवादाच्या विद्रोही कविता सादर करून उपस्थित आंबेडकरी जनतेची मने जिंकिली. या विद्रोही कवि संमेलनात नामांकित कवींसह नवोदित कवीही सहभागी झाले होते.

बीड शहरातील सामाजिक न्याय भवन येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने ४ ते १४ एप्रिल या कालावधीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने विद्रोही कवि संमेलन पार पडले. विद्रोही कवि संमेलनाच्या अध्यक्षस्थानी संदीपान निर्मळ तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.संजय कांबळे, आबासाहेब जगझाप, अशोक मस्लेकर आदी उपस्थित होते. कविता विद्रोही परिवर्तनाच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक यांनी केले.

सुत्रसंचलन सुमेध जोगदंड, अॅड.नितीन वाघमारे, सुनिल डोंगरे यांनी केले.आभार प्रणित सरवदे यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती तसेच विद्रोही कविता संमेलन समितीच्या पदाधिकारी, कार्यकर्ता यांनी परिश्रम घेतले. यावेळी आंबेडकरी जनतेची मोठ्या संख्येनी उपस्थिती होती.जयभिम महोत्सवात साजऱ्या होणाऱ्या उर्वरित कार्यक्रमांना जनतेने उपस्थित रहावे असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने केले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे, महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले.प्रथम शोएब शौकत आतार, प्रिती उगले, शिवानी गाडेकर, उत्तेजनार्थ तृप्ती उपरे, पृथ्वीराज उगले, उत्तेजनार्थ संघवी सुमेध जोगदंड, अन्वी जोगदंड यांना वितरित करण्यात आले.

## अमोल जाधव याचा गावकऱ्यांच्या वतीने जाहीर सत्कार

युसूफवडगांव। प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसुफवडगांव येथील अमोल दत्तात्रय जाधव हा पहिलाच असा मुलगा आहे जो तालुक्यातुन नव्हे तर जिल्ह्यातुन आय.आय.टी प्रवेशासाठी पात्र ठरला आहे त्याबद्दल त्याचा गावकऱ्यांच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला आहे.

नुकत्याच काही दिवसापुर्वी आय आय टी पात्र गेट परिक्षाचा निकाल लागला होता यामध्ये त्याने घवघवीत असे यश संपादन करून ऑल इंडिया रँकमध्ये ७४७ क्रमांक मिळवुन तो आय.आय.टी सारख्या भारतातील सर्वोच्च शिक्षण संस्थेमध्ये त्याने प्रवेश मिळवुन ग्रामिण भागातील विद्यार्थी सुद्धा कशातच कमी नाही हे त्या दाखवुन दिले आहे. वडील दत्तात्रय जाधव यांनी शेतामध्ये मोलमजुरी व खवा भट्टी चालवुन आपल्या मुलाला चांगले शिक्षण देऊन त्याचा कायम पाठीशी राहिले अमोलने आपल्या वडिलांच्या कष्टाचे चिज करून दाखवत तो आय आय टी प्रवेशासाठी पात्र ठरला



आहे त्याबद्दल त्याचा व त्याचे वडिल दत्तात्रय जाधव यांचा गावकऱ्यांच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला.यावेळी सरपंच महेश गायके, उपसरपंच महेश लामतुरे,डॉ.महादेव कोरसळे, प्रभुलिंग पाटील,शिवदास थळकरी,ग्रामसेवक ओम चोपणे,बापुराव चोपणे,शिवकुमार कोरसळे,अरूण राऊत, हनुमंत जाधव, शाम रोडगे,मन्मथ पाटील, विकास जाधव, अनिल निकम, बाबु शिंदे, मयुर खंडेलवाल, नवनाथ जाधव, श्रीकांत सौंदणे, पत्रकार सचिन उजगरे, शहाजी शिंदे,राजु गायके हे उपस्थित होते.

## येवलवाडीच्या सरपंचांवर अविश्वासाचा ठराव

### राजकीय दबाव तंत्रामुळे प्रशासनाच्या निर्णयाकडे लक्ष

पाटोदा । प्रतिनिधी

तालुक्यातील येवलवाडी ग्रामपंचायतची निवडणुक होऊन सव्वा दोन वर्षांचा कालावधी पूर्ण झालेला आहे. या कालावधीत सरपंचाचा कारभार त्यांचा पती हाकत असल्यामुळे आणि गावात विकास कामे होतं नसल्याने गावकरी आणि ग्रामपंचायत सदस्य देखील समाधानी नाहीत. त्यामुळे याबाबत अविश्वास ठराव घेण्यात आला होता.शुक्रवारी (दि.११) याची सुनावणी पाटोदा तहसीलदार यांच्यासमोर होणार आहे. दरम्यान अविश्वास ठराव आणल्यामुळे लोकप्रतिनिधी यांनी पुढाकार घेऊन सदस्यांवर दबाव आणण्याचा प्रयत्न सुरु केले आहेत. प्रशासनावर देखील राजकीय दबाव आणण्याचा प्रयत्न आत सुरु झाल्याच्या चर्चा असल्यामुळे आता तालुका दांडाधिकारी यांच्या निर्णयाकडे लक्ष लागले आहे.पाटोदा तालुक्यातील येवलवाडीमधील ग्रामपंचायत सात सदस्यांची आहे. सव्वा दोन वर्षांपूर्वी झालेल्या निवडणुकीत सरपंच म्हणून नागरगोजे विजया किशोर निवडणून आल्या होत्या.ही ग्रामपंचायत महिलाला सुटली असताना याचा कारभार सरपंचपतीच हाकत होते. गावात ग्रामसभा नाही,विकास कामे होतं असताना सदस्यांना विश्वासात घेतले जात नव्हते, कामात होणाऱ्या सततच्या अनियमितता त्यामुळे याबाबत अविश्वास ठराव घेण्यात आला. यात सहा सदस्यांनी स्वाक्षरी करत कराभाराबाबत नाराजी व्यक्त केली होती. प्रशासनाला दिलेल्या निवेदनावर चिमाकांत नागरगोजे,रत्नमाला नागरगोजे, मधुकर नागरगोजे,उर्मिला नागरगोजे,चतुरा नागरगोजे,इंदूबाई नागरगोजे या सहा सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. याची सुनावणी शुक्रवारी पाटोद्याच्या तहसीलदार यांच्या समोर होणार आहे. दरम्यान राजकीय दबावामुळे आता सरपंचाचे पद जाते की राहते हे पाहणे महत्वाचे ठरेल.

## बाबासाहेबांनी समतेची बीजे रुजविली- डॉ.राजेंद्र गोणारकर

बीड । प्रतिनिधी

आपल्या बौद्धिक सामर्थ्य,अगाध ज्ञान, प्रचंड अभ्यास आणि लढ्यांच्या जोरावर इथली माणूसपण नाकारणारी मूल्यव्यवस्था नाकारली. त्यामुळे माणूस गुलामीतुन मुक्त झाला.एवढे महान कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मानव जातीसाठी केले. त्यातून समतेची बीजे रुजली गेली. असे परखड मत डॉ.राजेंद्र गोणारकर यांनी व्यक्त केले.

बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे, दि.४ ते १४ एप्रिल या कालावधीत जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने मंगळवार (दि.८) एप्रिल रोजी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.त्यावेळी डॉ.राजेंद्र गोणारकर बोलत होते. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून दत्तात्रय क्षीरसागर, प्रमुख पाहुणे म्हणून सुरेश साबळे, उत्तम पवार, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे प्रमुख गौतम चोपडे विचार मंचावर उपस्थित होते. यावेळी उपस्थित आंबेडकरी जनतेला संबोधित करतांना, डॉ.राजेंद्र गोणारकर म्हणाले की, त्या काळी अतिशय विपूल परिस्थिती असतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समाज जागृतीसाठी व न्याय हक्कासाठी विविध वृत्तपत्रे सुरु केली.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/१०१
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- २८/०२/२०२५

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) सोमित्रा राजू पाखरे २) विजय बाबुराव पाखरे सिटी सर्व्हे नं. ६३३ न.प.मि.न.-५-२५० चे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. () दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व-रस्ता -
पश्चिम : गायकवाड कुटूंबियांची जागा
दक्षिण-रामराव पाखरे यांची जागा
उत्तर - रस्ता

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

## संविधान असताना ही परिस्थिती जर संविधान नसते तर काय अराजकता माजली असती - डॉ.रामपाल

आष्टी। प्रतिनिधी

आजच्या परिस्थितीमध्ये महापुरुषांच्या विचारांची समाजाला फार मोठी गरज आहे मात्र तसे न होता .आज युवा पिढी मोबाईलच्या आहारी जाऊन सोशल मीडियाच्या माध्यमातून जाती जातीमध्ये तेढ निर्माण करण्याचे काम करत आहे शिवाजी महाराज महाराजं मराठ्यांचे डॉ बाबासाहेब आंबेडकर बुद्धांचे तर महात्मा फुले माळ्यांचे अशी विभागणी आज कोणी केली याचा फायदा कोण घेतेय हे देखील अभ्यासा करून आज जातीपाती मध्ये विष पेरण्याचे काम हे मनोवादी करत आहेत त्याकरता मित्रांनो आज भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी जी राज्यघटना लिहिली त्या घटनेच्या आधारे तरी आज समाजामध्ये काय कायदाव्यवस्था बाधित आहे जर बाबासाहेबांचे संविधान नसते तर या देशातील गोरगरीब लोकांवर तर मोठा अन्याय अत्याचार वाढतच राहिला असता असता असे प्रतिपादन सप्त खंजिरी वादक समाजप्रबोधनकार डॉ रामपाल यांनी आष्टी शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यानामध्ये आयोजित सार्वजनिक जयंती निमित्त व्याख्यानमालेच्या तिसऱ्या दिवसाचे पुष्पगुंतांनी केला.शिका संघटित व्हा संघर्ष करा शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे असे बहुमोल विचार देणारे घटनेचे शिल्पकार महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले साने गुरुजी अशा अनेक महापुरुषांचे चरित्र पाहिले तर ते समाजासाठी जगले आणि समाजासाठी त्यांनी आपला प्राण अर्पण केला त्यामुळे व्यक्ती हा किती दिवस जगतो याला महत्व नसून तो समाजासाठी अथवा इतरांसाठी काय उपयोगी पडतो याला महत्त्व आहे मरावे परी कीर्ती उरावे याप्रमाणे या महापुरुषांनी आपले कार्य केले कोटी ची संपत्ती असलेल्या व्यक्तीला ही एकचं मताचा अधिकार व झोपडीत राहणारा गरिबाला ही एकच मताचा अधिकार अधिकार बाबासाहेबांच्या राज्यघटनेने प्रत्येकाला दिला आज त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना डोक्यावर घेऊन नाहीतर डोक्यात घेण्याची गरज आहे युवा पिढी ही वाचनाकडे दुर्लक्षित असून यामुळे वाचाल तर वाचाल तर वाचाल नाहीतर भंगारात फेकाल अशी अवस्था झाली आहे आज राज्यामध्ये कित्येक हजाराच्या वर जिल्हा परिषदेच्या शाळा बंद पडले आहे एकीकडे सांगायचे मराठी भाषेला अभिभाषिक दर्जा दिला जातोय तर दुसरीकडे इंग्रजी शाळेचे ज्या मोठे जाळे निर्माण करण्याचे काम या राज्य सरकारने केले आहे याकरिता मायबापांनो आपल्या लेकरांना चांगले संस्कार द्या त्यांना पुस्तके वाचायला लावा शिका संघटित व्हा आणि संघर्ष करावा जातीपातीचे राजकारण करू नका आपला वापर फक्त निवडणुकीपुरता व मतदाना पुरता राजकारणी लोक घेत असतात त्याकरिता प्रत्येकाने ही जातीपातीची दरी दूर करून गुण्यागोविंदाने रहावे आहे अशी तुम्हाला मी आज कळकळीची विनंती करतो

आष्टी शहरांमध्ये गेल्या ६४ वर्षापासून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त बीड नगर रोडवरील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर उद्यानामध्ये व्याख्यानमालीच्या आयोजन करण्यात येते यावर्षी देखील जनते समितीचे अध्यक्ष गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर पर्यंत गायकवाड व त्यांच्या सहकाऱ्यांनी सप्त दिनीची ही व्याख्यानमाला आयोजित केली आहे यामध्ये मागच्या दोन दिवसापूर्वी व पुढील पाच दिवशी विविध स्तरातील प्रसिद्ध असे व्याख्याते या ठिकाणी आपले विचार मांडत आहे या कार्यक्रमास महिलांची पुरुषांची वाघगोपालांची उपस्थिती चांगल्या प्रकारे होती.कार्यक्रमांमध्ये शालेय विद्यार्थ्यांना पुस्तकाचे वाटप करून रामपाल यांनी प्रोत्साहन दिले

# खासगी रूग्णालयासारखी दर्जेदार सरकारी रूग्णालये बनविण्याची जबाबदारी कोणाची ?

## सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांचा सवाल

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सध्या दीनानाथ मंगेशकर रूग्णालय प्रकरण खूप गाजत आहे. यामध्ये दोष कुणाचा, दोषींना कठोर शिक्षा झाली पाहिजे, इथून ही चर्चा वाढत वाढत जाऊन सर्वसामान्य स्तरावर खाजगी रूग्णालये कशी पेशंटची अडवणूक करतात, त्यांना नको त्या तपासण्या करायला लावतात, अव्वाच्या सव्वा फीस आकारतात, डॉक्टर्स हे राक्षस झालेले आहेत. इथपर्यंत पोहचलेली आहे. येणारे काही दिवस ही चर्चा, मीडिया ट्रायल सगळं घडवून आणलं जाईल. लोकांमध्ये डॉक्टर्सविरूद्धच वातावरण तापविण्यात येईल आणि काही दिवसांनी हा विषय संपून राजकारण्यांना सोयीचा असलेला, राजकीय फायदा मिळू शकत असलेला दुसरा विषय पुढे आणण्यात येईल. या प्रकरणाच पुढे काय झालं, पीडितांना न्याय मिळाला का नाही ? याचा मागोवा सुद्धा घेण्याची तसदी काही काळानंतर आता बेंबीच्या देठापासून ओरडणारे घेणार नाहीत.

या विषयावर लिहायचं कारण असं की, दीनानाथ मंगेशकर रूग्णालयाच्या निमित्ताने अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव नुकताच साजरा करीत असताना भारत कसा महासत्ता बनत आहे. याच्या पोकळ वल्गनाच सरकार द्वारे केल्या जात आहेत. स्वातंत्र्यानंतर महासत्ता होऊ पाहणाऱ्या भारताला आजही अन्न, वस्त्र, निवारा, वीज, दळणवळण सोयी, मोफत दर्जेदार शिक्षण, पक्के रस्ते, मूलभूत दर्जेदार आरोग्य सुविधा या मूलभूत हक्कांच्या सुविधा उपलब्ध होत नाहीत हे कटुवास्तव एकिकडे आ वासून उभे आहे. दीनानाथ मंगेशकर रूग्णालयात घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी आहे, याची निष्पक्षपातीपणे चौकशी होऊन दोषींना कडक शिक्षा व्हावी यात कोणाच्याही मनात दुमत नाही. परंतु, पुण्यात महाराष्ट्रात गाजलेले शासकीय ससून रूग्णालय असताना देखील लोकांना खाजगी रूग्णालयातच जाऊन आपल्या रूग्णाचा विलाज करावा वाटणे ही शासकीय आरोग्य व्यवस्थेची झालेली दुर्दशा वाताहत आहे. लोकांचा विश्वास आज या मोडक्या तोडक्या कोलमडलेल्या आरोग्य व्यवस्थेवर राहिलेला नाही याचे द्योतक आहे. याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे कोरोना काळात शासकीय आरोग्य व्यवस्थेचे निघालेले वाभाडे आणि त्याकाळात खाजगी रूग्णालयाची, खाजगी डॉक्टर्सची शासकीय यंत्रणेला अगतिकतेने, हतबलतेने मदत घ्यावी लागली हे आहे. त्यावेळी सर्व खाजगी रूग्णालयांनी खाजगी डॉक्टर्सनी सुद्धा मागेपुढे न पाहता शासनाला आरोग्य व्यवस्थेला मदत केली. मग प्रश्न हा उरतो की खाजगी रूग्णालयात जशी वेळीच दर्जेदार, उत्तम, आरोग्य सुविधा मिळते तशी सुविधा शासकीय रूग्णालयात उपचारासाठी दाखल झालेल्या सर्वसामान्य रूग्णाला का मिळत नाही..? शासकीय रूग्णालये खाजगी रूग्णालयाप्रमाणे दर्जेदार बनविण्याची जबाबदारी इथल्या सरकारची आहे का.. पाकिस्तानच्या सरकारची हा प्रश्न निर्माण होतो. परवडतील अशा दरात आरोग्य सुविधा मिळणे हा प्रत्येक रूग्णाचा हक्क आहे आणि तो देणे हे सरकारचे बंधनकारक कर्तव्य आहे. तो जर मिळत नसेल तर याचा जाब कुणाला विचारायला पाहिजे आणि कोण याला उत्तर देण्यास जबाबदार आहे याचा खुलासा झाला पाहिजे. दीनानाथ मंगेशकर रूग्णालयाच्या घडलेल्या दुःखद घटनेच्या निमित्ताने एक मोठा गैरसमज सर्वसामान्य जनतेच्या मनात पेरला जातं आहे. मुळात हे समजून घेतले पाहिजे की खाजगी रूग्णालय ,खाजगी डॉक्टर्स व दीनानाथ मंगेशकर रुग्णालय यांच्यासारखे धर्मादाय हॉस्पिटल किंवा धनदांडग्या लोकांनी काढलेल्या कॉर्पोरेट हॉस्पिटल यामध्ये जमीन आसमानचा फरक आहे. दीनानाथ मंगेशकर रूग्णालय हे धर्मादाय पण, कॉर्पोरेट रूग्णालय आहे. यामध्ये एक विश्वस्त समिती असते. अशी कॉर्पोरेट हॉस्पिटल्स एखाद्या कंपनी प्रमाणे हे रूग्णालय कामं ... यामध्ये जसा कंपनीचा मा... कंपनीला फायदा होण्याच्या ... पगारी लोक आपल्या कं... असतात, विविध प्रकारचे नो... फायद्याच्या दृष्टीने आव... कंपनीमध्ये नोकरीसाठी ठेवत... कॉर्पोरेट हॉस्पिटल मध्ये या सं... होण्याच्या दृष्टीने आवश्य... डॉक्टर्स, नर्सेस, विविध कर्मचा... मंडळी आपल्या रूग्णालयास... पगारी नोकर ठेवल्यासारखे ठे... हे विश्वस्त मंडळ रूग्णालय प्रशासन कारभार चालवत असते. कोणत्या रूग्णाला भरती करायचे, कोणत्या रूग्णाला भरती करायचे नाही, कुणाकडून किती पैसे घ्यायचे, कुणाला किती सवलत द्यायची हे सर्व या सर्व बाबी ही प्रशासन विश्वस्त मंडळ आखून देत असते व त्याबरहुकूम त्यांची हि नोकर मंडळी कामं करत असते. या विश्वस्त मंडळात अनेक राजकारणी अनेक नेते, अनेक पुढारी, अनेक धन दांडगे, अनेक व्यापारी, एखादा धनाढ्य डॉक्टर अशी मंडळी समाविष्ट असतात. अशा प्रकारे बनलेले हे विश्वस्त मंडळ एखाद्या धंद्यामध्ये जसा पैसा गुंतवून पैसा मिळवितात त्यादृष्टीने कामं करत असतात. त्यांचा हा पैसे कमविण्याचा धंदा झालेला आहे. यामध्ये तिथे कामावर ...ा कसलाच दोष नसतो. ...ोकरदाराप्रमाणे आपली ...्याला पगार उचलत ...ने हा प्रश्न निर्माण झाला ... वैद्यकीय क्षेत्रात अशा ...ाल्याने याचा डॉक्टर्स– ... अत्यंत वाईट परिणाम ...पचार करणाऱ्या डॉक्टर्स ...न घेणाऱ्या रूग्ण आणि ...ात असुरक्षिततेची भावना ... ते भविष्याच्या दृष्टीने ... उपचार करून घेणाऱ्या रूग्णाचा त्याच्या डॉक्टरवर पूर्णपणे विश्वास पाहिजे तरच उपचार यशस्वीपणे पार पडू शकतो. परंतु, वैद्यकीय क्षेत्र हे आर्थिक फायद्याचे क्षेत्र आहे हे ओळखून यात धनदांडग्या लोकांचा, नेत्यांचा, राजकारणी लोकांचा झालेला प्रवेश ही भविष्यातील धोक्याची घंटा आहे. त्यामुळे अशा कॉर्पोरेट हॉस्पिटल्सचा कावा लोकांनी ओळखला पाहिजे. आजही खाजगी डॉक्टर्सद्वारे चालविण्यात येत असलेले बहुसंख्य छोटे मोठे दवाखाने माणुसकीचे मूल्य जपून, वैद्यकीय सेवा हे व्रत समजून रुग्णांचा उपचार करीत आहेत. आतातर सरकारच्या नवीन धोरणाप्रमाणे आता ही खऱ्या अर्थाने सेवा देणारे छोटे मोठे दवाखाने बंद पाडून पैशासाठी रूग्णांना अडविणाऱ्या दीनानाथ मंगेशकर रूग्णालयासारखी कॉर्पोरेट हॉस्पिटल ज्याचे मालक अंबानी अडाणी सारखे धनदांडगे उद्योजक असतील अशी रूग्णालये उभी करण्याचा घाट घालत आहे. म्हणजे यापुढे गल्लीबोळात, सहज उपलब्ध होणारी, रूग्णाच्या कुटुंबियांशी जिव्हाळ्याचे संबंध असणारे डॉक्टर यांचे हॉस्पिटल बंद पाडून अशा डॉक्टर्सला या कॉर्पोरेट हॉस्पिटलमध्ये नोकरी करण्यास भाग पाडून त्यांची गल्लीबोळात मिळत असणारे स्वस्तातली वैद्यकिय रूग्णसेवा महाग करून रूग्णांकडून पैसे उकळण्याचा डाव शासकीय यंत्रणा व सरकारचा आहे. त्यामुळे सर्वसामान्य लोकांनी आपला उपचार महागड्या कॉर्पोरेट हॉस्पिटलमध्ये करायचा का तुमच्याशी जिवाळ्याचे संबंध असणाऱ्या एखाद्या फॅमिली डॉक्टरकडे करायचा हा प्रश्न यानिमित्ताने उभा झालेला आहे. त्यामुळे भविष्यातील आरोग्य व्यवस्थेला निर्माण होत असलेला हा धोका सर्वसामान्य लोकांनी आताच ओळखला पाहिजे व याला विरोध केला पाहिजे, अन्यथा भविष्यात आपल्या आरोग्यासाठी आपल्याला न परवडणारी आरोग्यसेवा या कॉर्पोरेट हॉस्पिटल कडून बळजबरीने



पान ३ वर

## गंभीर गुन्ह्यातील आरोपीसह वडीलांच्या फिर्यादीच्या आईस गुन्हा परत घेण्यासाठी धमक्या

### फिर्यादीच्या आईची पोलीसात धाव ;तिघांविरोधात एन.सी.आर.दाखल

माजलगाव । प्रतिनिधी

येथील शहर पोलीस ठाण्यात दि १८ मार्च २०२५ रोजी दाखल असलेला गंभीर गुन्हा परत घेण्यासाठी फिर्यादीच्या आईस यातील आरोपी व आरोपीच्या वडीलांनी गुन्हा परत घेण्यासाठी धमक्या दिल्याने फिर्यादीच्या आईने पोलीसात धाव घेत धमक्या देणाऱ्यां विरोधात फिर्याद दिल्याने मागील गुन्ह्यातील आरोपी व आरोपीच्या वडीलासह दोघांविरुद्ध माजलगाव शहर पोलीस ठाण्यात दि ०८ एप्रिल २०२५ रोजी एन.सि.आर.दाखल करण्यात आली आहे.

यासंदर्भात दि १८ मार्च २०२५ रोजी दाखल असलेल्या गंभीर गुन्ह्यातील फिर्यादीची आई बानु जनशेद पठाण वय ५५ वर्ष रा. आझादनगर माजलगाव यांनी दि ०८ एप्रिल रोजी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत असे म्हटले आहे की, मी वरील ठिकाणी माझे पती व मुला बाळांसह राहणार असुन घरकाम करुन कुटुंबाची उपजिवीका भागवते.माझा मूलगा नामे सलगान खाँन जम्शेद खाँन पठाण याला जिवे मारण्याचा प्रयत्न करणारे आरोपी नामे १) परवेझ पाशा शेख,रा. फुलेनगर माजलगाव,याचे वडील नामे शेख पाशा मनियार व भाऊ नामे शेख शोयब पाशा मनियार,शेख शेहबाज पाशा मनियार यांनी आम्ही दि १८ मार्च २०२५ रोजी सायंकाळी २०:०० वाजता तक्रार दिल्या पासुन मी जिथे कोठे त्यांना दिसते त्या ठिकाणी वरील तीनही लोक मला म्हणतात की, तुझ्या मुलाने पोलीस ठाण्यात दिलेली तक्रार मागे घे जर तक्रार मागे नाही घेतलीस तर मी तुझ्या मुलाचे याच्यापेक्षा बेकार हाल करून मारेन व तुझ्या कुटुंबाला सुध्दा माजलगाव मध्ये राहू देणार नाही.व तुमचे सुध्दा तुझ्या मुलगा सलमान सारखेच हाल करुन मारुत. असे म्हणुन धमक्या दि.०८ एप्रिल रोजी पंर्यत

## मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल



### आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने केला सन्मान

बीड । प्रतिनिधी

आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने नेहमीच विविध सामाजिक उपक्रम राबवून सामाजिक कार्यात अग्रेसर असणारा पत्रकारांचा संघ असून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येतो तर ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त कतुत्वान महिलांचा नारी सन्मान पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येत असते याच धर्तीवर गेल्या दोन वर्षीपासून दर्पण दिनानिमित्त उल्लेखनीय कार्य करणाऱ्या जेष्ठ पत्रकारांना आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने सन्मानित करण्यात येते याच अनुषंगाने बीड येथे मंगळवार दि ८ एप्रिल रोजी मराठी पत्रकार परिषद बीड जिल्हा पदाधिकारी यांच्या बैठकीत मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख सर यांना आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने

पान ३ वर



बीड : मराठी पत्रकार परिषद च्या वतीने नव्याने रुजू झालेले बीड जिल्हा शल्य चिकित्सक संजय राऊत यांचा सत्कार करताना ज्येष्ठ संपादक सर्वोत्तम आण्णा गावरस्कर, विभागीय संघटक सुभाष चौरे, जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, विभागीय सचिव रवी उबाळे, जिल्हा प्रसिद्ध प्रमुख संजय हंगे, डॉ. हनुमंत पाखरे, राज्य कार्यकारिणी सदस्य विलास डोळसे उपस्थित होते.

## रमाई आवास घरकुल योजने अंतर्गत आ.धस याच्या माध्यमातून पाटोदा शहरात २१० घरकुल मंजूर –सभापती किशोर अडागळे

पाटोदा । प्रतिनिधी

रमाई आवास घरकुल योजने अंतर्गत पाटोदा शहरात २१० घरकुल मंजूर करून आणल्याबद्दल बौध्द मातंग चर्मकार समाजाच्या वतीने कार्यसम्राट विकासभू आमदार सुरेश आण्णा धस यांचे जाहीर



आभार व्यक्त करण्यात आले.पाटोदा शहरात मागील काही काळापासून घरकुलांची गंभीर आवश्यकता होती.ही बाब आमदार सुरेश आण्णा धस यांनी लक्षात घेऊन राज्य शासनाच्या मदतीने पाटोदा नगरपंचायत अंतर्गत २१० घरकुलांची मंजुरी मिळवून दिली (पान ३ वर)

## पिंपळारुई ग्रामपंचायतीला सिल्व्हर मेडलचा बहुमान



**वडवणी । प्रतिनिधी**

टिबी या आजाराला गांवस्तरावरुन हद्दपार केले असल्याने वडवणी तालुक्यतील पिंपळारुई या ग्रामपंचायत कार्यालयाला सिल्व्हर मेडलचा बहुमान मिळाला आहे. कालच सरपंचासह इतर मान्यवराचा जिल्हा प्रशासनाच्या वतीने पुरस्कार वितरण संपन्न झाले आहे.

आज टिबी मुक्त ग्रामपंचायत २०२३-२४ या महाराष्ट्र शासनाच्या योजनेतून पिंपळारुई या ग्रामपंचायतला वडवणी तालुक्यातुन सिल्व्हर मेडल मिळवण्याचा बहुमान मिळाला आहे. टिबी हरेगा देश जितेगा हा नारा घेऊन टिबी मुक्त भारत देश करण्यासाठी गावं पातळी ते देश पातळीवर सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. त्या अनुषंगाने प्रोत्साहन देण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. ज्यांच्या कष्टाने हे यश मिळाले तालुका आरोग्य अधिकारी डॉ. निपटे यांच्या पान ३ वर

## पशूसंवर्धन विभागाचे काम अधिक गतीमान करण्यासाठी मंत्री पंकजा मुंडे यांचे महत्वाचे पाऊल



### पशुधन विकास अधिकाऱ्यांची २७९५ पदे भरणार

मुंबई । प्रतिनिधी

पशुसंवर्धन विभागाचे काम पूर्ण क्षमतेने करण्यासाठी राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी महत्वाचे पाऊल उचलले असून विभागातील रिक्त पदे भरण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. त्याअंतर्गत पशुसंवर्धन सेवा गट अ मधील पशुधन विकास अधिकारी संवर्गातील २७९५ पदे भरण्यासंदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला मागणी पत्र सादर करण्यात आल्याची माहिती पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली आहे.

ग्रामीण भागात पशुसंवर्धन विभागाचे काम गतीने व पूर्ण क्षमतेने होण्यासाठी पशुसंवर्धन विभागातील पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय आयुक्तालय तसेच त्यांच्या अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयातील पशुधन विकास अधिकारी पद महत्त्वाचे आहे. सुधारित आकृती बंधानुसार महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा गट अ अंतर्गत पशुधन विकास अधिकारी संवर्गात एकूण ४६८४ पदे मंजूर आहेत. त्यापैकी सद्यःस्थितीत १८८६ पदे भरलेली असून २७९८ पदे रिक्त आहेत. तसेच ३१ डिसेंबर २०२५ अखेर ८ पदे सेवानिवृत्तीमुळे रिक्त होणार आहेत. असे एकूण २८०६ पदे रिक्त होणार आहेत. ही पदे रिक्त असल्याने कामकाजावर परिणाम होत होता. या गोष्टीची दखल घेत पशुसंवर्धन मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी पाठपुरावा करून पशुधन विकास अधिकारी संवर्गातील पदे भरण्याचा निर्णय घेतला. यापैकी सरळसेवा जाहिरात क्र. १२/२०२२ मधील प्रतिक्षायादीतील ११ पदे उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरू आहे. उर्वरित २७९५ पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला मागणीपत्र सादर करण्यात आले आहे.

विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्याचे निर्देश देण्यात आले असून लवकरात लवकर भरती प्रक्रिया राबविण्यात यावे, असे एमपीएससीला कळविण्यात आले आहे. ही रिक्त पदे भरल्यानंतर विभागाचे कामकाज अधिक वेगाने होऊन ग्रामीण भागातील पशुपालक तसेच शेतकरी बांधवांना चांगल्या दर्जाची सेवा उपलब्ध होईल, असा विश्वास श्रीमती मुंडे यांनी यावेळी व्यक्त केला.

## महावीर जंयतीनिमित्त कत्तलखाने व मांस विक्रीचे दुकाने बंद ठेवावेत –नगराध्यक्ष जिया बेग

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरात जैन धर्मातील महान तीर्थंकर यांचा जन्मदिवस म्हणून महावीर जयंती आष्टी शहरात मोठ्या उत्साहात साजरी केली जाणार आहे. शहरातील आज गुरुवार दि.१० एप्रिल रोजी महावीर जंयतीनिमित्त दिवसभर कत्तलखाने व मांस विक्रीचे दुकाने बंद ठेवण्याचा निर्णय आष्टी नगर पंचायतच्यावतीने घेण्यात आला असल्याची माहिती आष्टी नगर पंचायतचे नगराध्यक्ष जिया बेग यांनी दिली.

आष्टी शहरात जैन धर्मातील महान तीर्थंकर यांचा जन्मदिवस म्हणून महावीर जयंती शहरात मोठ्या उत्साहात साजरी केली जाणार असून जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे याच पार्श्वभूमीवर शहरातीलगुरुवार दि. १० एप्रिल रोजी महावीर जयंती



साजरी होणार आहे.यामुळे आष्टी शहरातील गुरुवार दि.१० एप्रिल रोजी महावीर जंयतीनिमित्त दिवसभर कत्तलखाने व मटण,चिकन,मासे, विक्री करणारे सर्व दुकाने बंद ठेवण्यात येणार आहेत. मांसविक्री होणार नाही.असा निर्णय आष्टी नगरपंचायत यांनी निर्णय घेतला आहे.या आदेशाचे विक्रेत्यांनी पालन करावे असे आवाहनही नगराध्यक्ष जिया बेग यांनी केले आहे.

## बार्टीच्या वतीने सामाजिक समता सप्ताह अंतर्गत मोरेवाडी येथे प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे, अंतर्गत महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक समता सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताह अंतर्गत समतादूत प्रकल्पाद्वारे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून अंबाजोगाई तालुक्यातील मोरेवाडी येथे भारतीय संविधानावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली.



अंबाजोगाई तालुक्यातील मोरेवाडी येथील जिल्हा परिषद शाळा येथे बार्टीचे समतादूत व्यंकटेश जोशी यांनी भेट देऊन भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित सामाजिक सप्ताह अंतर्गत शाळेचे मुख्याध्यापक एम.आर.मिसाळ यांना संविधान उद्देशिका भेट देण्यात आली. तसेच इयत्ता ७ वी च्या वर्गात संविधान उद्देशिका वाचन व भारतीय संविधानावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत इयत्ता ७ वी चे सर्व विद्यार्थी सहभागी झाले होते. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक एम.आर.मिसाळ, युवा प्रशिक्षणार्थी अश्विनी लिंबाजी भालेराव व सर्व सहशिक्षक उपस्थित होते. हा कार्यक्रम बार्टीचे महासंचालक, प्रकल्प अधिकारी समतादूत प्रकल्प जिल्हा, बीड यांच्या मार्गदर्शनानुसार तालुक्यातील समतादूत व्यंकटेश जोशी यांनी आयोजित केला होता.

## महिलांनी महिलांसाठी चालविलेल्या क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला नागरी सह पतसंस्थेस मार्च २०२५ अखेरिस रुपये ३ लाख निव्वळ नफा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई पंचक्रोशीतील महिलांचा आर्थिक स्तर उंचावण्याच्या उदात्त हेतूने केवळ महिलांनी महिलांसाठी साधारणतः नऊ वर्षा पूर्वी सुरू करण्यात आलेल्या क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला नागरी सहकारी पतसंस्थेस ३१ मार्च २०२५ अखेर रुपये ३ लक्ष एवढा नफा झाल्याची माहिती पतसंस्थेच्या अध्यक्षा सौ . सुनीता राजकिशोर मोदी यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे .आपला भारत देश हा पुरुष प्रधान संस्कृतीचा देश आहे . देशात महिलांना जरी दुय्यम स्थान देण्यात आले असले तरीही आजची महिला ही पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून त्यांच्यासोबत उभा राहण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे नेहमी घर, चूल आणि मूल यामध्येच गुरफटून पडलेल्या महिलांना काही प्रमाणात आर्थिक स्वायत्तता मिळवून देण्यासाठी व महिलांचा आर्थिक स्तर उंचावून त्याचा फायदा कुटुंबाला व्हावा याच पवित्र हेतूने केवळ महिलांसाठीच राजकिशोर मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला नागरी सहकारी पतसंस्थेची निर्मिती करण्यात आल्याची माहिती पतसंस्थेच्या अध्यक्षा सौ. सुनीता राजकिशोर मोदी यांनी दिली.

या पतसंस्थेच्या आर्थिक व्यवहार व विकासाच्या दृष्टीने पर्यायाने अंबाजोगाई शहरातील महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी संस्थेच्या उपाध्यक्षा डॉ. धाकडे राजश्री राहुल , सचिव खडकभावी शोभा बाबू , तसेच संचालिका डॉ. धर्मपात्रे रुपाली सुधीर, सरवदे संगीता विष्णू , मसने उषा गणेश, मस्के अंजली विष्णुपंत , रापतवार सविता विजय , खंडाळे सुरेखा बाबुराव , फारोखी परवीन नुजहत, मोहिते सायली सुहास त्याचबरोबर चोकडा जमुना जयप्रकाश यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे .

३१ मार्च २०२५ अखेर पतसंस्थेच्या सभासदांची संख्या ही २३१५ एवढी असल्याचे प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे. त्याचबरोबर संस्थेचे भागभांडवल हे रुपये २५लक्ष एवढे असून पतसंस्थेच्या एकूण ठेवी या रुपये ५ कोटी असल्याचे सांगून मार्च २०२५ अखेर पतसंस्थेने समाजातील महिलांना रुपये ३ कोटीचे अर्थसहाय्य ( कर्जवाटप) करून त्यांचा पर्यायाने त्यांच्या कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी प्रयत्न केला आहे. सावित्रीमाई फुले पतसंस्थेची अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेत ०३ कोटीची गुंतवणूक देखील केली असल्याचे सुनीता मोदी यांनी प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे. पतसंस्थेचा स्वनिधी हा रुपये ४१ लक्ष एवढा जमा असल्याची माहिती अध्यक्षा सुनीता राजकिशोर मोदी यांनी प्रसिद्धीपत्रकात दिली आहे.३१ मार्च २०२५ अखेर पतसंस्थेस रुपये ०३ लक्ष एवढा नफा झाल्याचे अध्यक्षा सुनीता मोदी यांनी सांगत या यशाचे सर्वस्वी श्रेय पतसंस्थेचे मार्गदर्शक राजकिशोर मोदी यांच्यासह पतसंस्थेच्या ठेवीदार ,सभासद आणि महिलांनी घेतलेल्या कर्जाचा वेळेवर परतावा यालाच द्यावे लागेल असेही सौ सुनीता मोदी म्हणाल्या. आजमितीला संस्थेत ०३ कर्मचारी यामध्ये शाखा व्यवस्थापक सागर कंगळे यांच्या समवेत सचिन काशीद , अनिल काळे व अंकुश माने हे कर्मचारी कार्यरत आहेत .तसेच ०१ नित्य निधी ठेव प्रतिनिधी सुध्दा संस्थेच्या कामात मोलाचा वाटा उचलत असल्याचे अध्यक्षा सौ. सुनीता राजकिशोर मोदी यांनी जाहीर केलेल्या प्रसिद्धी पत्रकातून सांगितले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# दीनानाथ रुग्णालयाने बदनामी केली, भिसे कुटुंबीयांची पोलिसात धाव; महिला आयोगाकडूनही कारवाईचे आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयासमोरील अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. तनिषा भिसे मृत्यू प्रकरणी भिसे कुटुंबीयांने आता पोलिसात धाव घेतली आहे. अंतर्गत समितीच्या नावाखाली दीनानाथ रुग्णालयाच्या प्रशासनाने बदनामी केल्याचा आरोप भिसे कुटुंबीयांनी केला आहे. याबाबत पुण्यातील अलंकार पोलिस चौकीत तक्रार दाखल करण्यात आली आहे. तर दुसरीकडे राज्य महिला आयोगानेही यासंबंधी कारवाई करावी असे आदेश पोलिस आणि मेडिकल कौन्सिलला दिले आहेत.




दिनानाथ रुगणालयाच्या अहवालामुळे चुकीचे प्रश्न निर्माण झाले आणि कुटुंबाला ट्रोल केलं गेलं असं भिसे कुटुंबीयांनी तक्रारीत म्हटलं आहे. तनिषा भिसेची खतक्र सारख्या ट्रीटमेंटची माहिती जगजाहीर केल्याने कुटुंबाची बदनामी झाली असल्याचा दावा करण्यात आला आहे. ज्या डॉक्टरांनी हा अहवाल जगजाहीर केला आहे त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी भिसे कुटुंबीयांनी केली आहे. अंतर्गत समितीच्या अहवालावर खालील डॉक्टरांच्या सह्या आहेत. या सगळ्यांवर कारवाई करण्याची मागणी भिसे कुटुंबीयांनी केली आहे. डॉ. धनंजय केळकर (वैद्यकीय संचालक), डॉ. अनुजा जोशी (वैद्यकीय अधीक्षक), डॉ. समीर जोग (अतिदक्षता विभागप्रमुख), सचिन व्यवहारे (प्रशासक), सुश्रुत घैसास

रुग्णालयावर कारवाई करावी, राज्य महिला आयोगाचे आदेश

दरम्यान, भिसे कुटुंबीयांनी केलेल्या तक्रारीनंतर आता राज्य महिला आयोगानेही रुग्णालयावर कारवाई करावे असे आदेश जारी केले आहेत. महिला आयोगाकडून पुणे पोलिस आयुक्त अन् मेडिकल काउन्सिलला कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत. भिसे कुटुंबीयांची परवानगी न घेता खासगी माहिती जगजाहीर केल्याने महिला आयोगाने कारवाईचे आदेश दिले आहेत. त्यामुळे मंगेशकर रुग्णालयाच्या अडचणीत आता आणखी भर पडण्याची शक्यता आहे.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी याबाबत ट्विटरवर पोस्ट करत माहिती दिली. या कारवाईचा अहवाल महिला आयोगाला सादर करण्याचे आदेश पुणे पोलिस आयुक्त आणि मेडिकल काउन्सलला देण्यात आले आहेत.

# बाईक टॅक्सी बंदसाठी पुण्यात रिक्षाचालकांचे आंदोलन

**पुणे । प्रतिनिधी**

बाईक टॅक्सी बंद करा, यामुळे आमच्या धंदयावर परिणाम होणार आहे. त्यातच मंत्री मंडळाने देखील बैठकीत मंजुरी दिली. त्यामुळे आम्हाला आता तीव्र आंदोलन केल्याशिवाय पर्याय उरलेला नाही. असे म्हणत, जोरदार घोषणाबाजी करत, पुणे जिल्हा रिक्षा चालक-मालक संघटना कृती समितीच्या वतीने पुणे आरटीओ कार्यालयासमोर बुधवारी (दि.०९) जोरदार आंदोलन करण्यात आले. यावेळी असंख्य रिक्षाचालक या आंदोलनात सहभागी झाले होते.




पुणे जिल्हा रिक्षा चालक-मालक संघटना कृती समितीच्या वतीने बुधवारी प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे सकाळच्या सुमारास आंदोलन करण्यात आले. शासनाने बाईक टॅक्सी धोरण त्वरित मागे घ्यावे, मुक्त रिक्षा परमिट बंद करावेत, टॅक्सी ॲग्रिकेटर पॉलिसी अंमलबजावणी करून कायदेशीर कारवाई करावी, कल्याणकारी मंडळ अंमलबजावणी त्वरित करावी, सीएनजी बाटला टेस्टिंग दर निश्चित करावेत. सरकारी/निमसरकारी परमिट बाद करावेत, ओला, उबेरप्रमाणे सरकारी ॲप उपलब्ध करावे, या आंदोलनादरम्यान प्रमुख मागण्या करण्यात आल्या. यावेळी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल भोसले यांना रिक्षा संघटनेच्या पदाधिकार्यांनी निवेदन दिले. यावेळी भोसले यांनी पुणे कार्यालय स्तरावरील रिक्षाचालकांचे प्रश्न तात्काळ सोडवण्याचे आश्वासन देत, शासन स्तरावरील समस्या तिथपर्यंत पोहोचवण्याचेही आश्वासन दिले. आंदोलनात शिवनेरी रिक्षा संघटना, आम आदमी रिक्षा चालक संघटना, भाजप रिक्षा आघाडी, महाराष्ट्र रिक्षा पंचायत, राष्ट्रवादी वाहतूक संघटना, आझाद रिक्षा चालक संघटना, सावकाश रिक्षा संघटना, महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक संघटना, शिवा वाहतूक संघटना, जनता गॅरेज रिक्षा संघटना या रिक्षा संघटना सहभागी झाल्या होत्या. या संघटनांचे पदाधिकारी, रिक्षाचालक सदस्यांनी जोरदार निदर्शने पुणे आरटीओ कार्यालयासमोर केली.

# पुण्यात परदेशी तरुणीवर अत्याचार; राजकीय कनेक्शनने खळबळ

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात २७ वर्षीय परदेशी महिलेवर ७ जणांकडून लैंगिक अत्याचार (झींपिश उीळाश छ्शुी) केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी पुणे पोलिसांनी ७ जणांना अटक केली असून यात राष्ट्रवादी काँग्रेसचा माजी पदाधिकारी शंतनू कुकडे यासह इतरांचा समावेश आहे. भूतानवरून पुण्यात शिक्षण आणि कामासाठी आलेल्या महिलेशी आधी ओळख करून तिच्याशी जवळीक साधत कुकडे याच्या मित्रांनी विविध ठिकाणी तिच्यावर अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. काही दिवसांपूर्वी कुकडे याला २ मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी अटक केली.

राष्ट्रवादी काँग्रेसचा माजी पदाधिकारी शंतनु कुकडे याला काही दिवसांपूर्वी पुणे पोलिसांनी २ मुलींवरती लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी अटक केली होती. मागील वर्षी या पदाधिकाऱ्याने पक्षातून राजीनामा दिला होता असं असलं तरी सुद्धा कुकडे विरोधात दोन्ही शिवसेनेकडून जोरदार टीका करण्यात आली होती. एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केलेल्या माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी कुकडे हा अनेकांचे धर्मांतर करत असल्याचा आरोप केला होता, तर उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेकडून कुकडे याच्या पुण्यातील नाना पेठेतील घराबाहेर आंदोलन करण्यात आले होते.



यावेळी सुद्धा कुकडे याच्या बँकेत किंबहुना त्याच्या संस्थेत विदेशातून पैसे येत असल्याचा आरोप करण्यात आला होता. (झींपिश उीळाश छ्शुी)

असं असताना आता कुकडे याच्याविरोधात २७ वर्षीय भूतानची रहिवासी असलेल्या एका महिलेने लैंगिक अत्याचार केल्याचे आरोप केल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणात कुकडे याच्या ६ मित्रांना सुद्धा अटक करण्यात आली आहे, यात एक डीजे तर एक जण वकील आहे. २०२० मध्ये शिक्षणासाठी आणि त्यानंतर नोकरी करण्यासाठी भारतात आलेल्या भूतान मधील या महिलेची ओळख या प्रकरणातील एका आरोपीशी झाली आणि त्याने तिची भेट कुकडे याच्यासोबत करून दिली. कुकडे याने त्या महिलेला पुण्यात वास्तव्यास जागा दिली आणि इतर मित्रांशी सुद्धा ओळख करून दिली. या ओळखीचा फायदा घेत कुकडे आणि त्याच्या इतर मित्रांनी वेळोवेळी विविध ठिकाणी जाऊन पार्टीच्या निमित्ताने तिच्याशी जवळीक साधली आणि याचा गैरफायदा घेत वेळोवेळी लैंगिक अत्याचार केले.

याप्रकरणी आता विरोधकांनी जोरदार टीका करायला सुरुवात केली आहे. राष्ट्रवादी पक्षाचा माजी पदाधिकारी असला तरी सुद्धा त्याच्यावर कठोर कारवाई केली पाहिजे अशी मागणी शिवसेना वेगळाच बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. तसेच कुकडे हा नाना पेठेत राहत असलेल्या ठिकाणी जी संस्था चालवत होता त्याची सुद्धा चौकशी करून त्या संस्थेच्या बँक खात्यात किती पैसे आहेत ते कुठून आलेत आणि त्या पैशाचा कुठे वापर झाला आहे याची चौकशींकरावी अशी मागणी करण्यात येतेय.

# डॉ. आंबेडकर जयंतीचे फ्लेक्स फाडणार्यास अटक

**वेल्हे । प्रतिनिधी**

वेल्हे-नसरापूर रस्त्यावरील विंझर (ता. राजगड) येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सिध्दार्थ प्रतिष्ठान व विविध संघटनांच्या वतीने लावलेले दोन्ही फ्लेक्स फाडून विटंबना करणार्या एका समाजकंटकास वेल्हे पोलिसांनी अटक केली.

राजू बबन भोसले (वय २७, रा. भुरुकवाडी, विंझर) असे अटक करण्यात आलेल्या समाजकंटकाचे नाव आहे. त्याच्याविरोधात याआधीही गुन्हे दाखल आहेत. याप्रकरणी भारतीय बौद्ध महासभेचे उल्हास गायकवाड यांनी वेल्हे पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. हा प्रकार रविवारी (दि. ६) रात्री सव्वाएकच्या सुमारास घडला आणि सोमवारी (दि. ७) सकाळी हा प्रकार उघडकीस आला.

या प्रकारामुळे गावात तीव्र संतापाची लाट पसरली आहे. या घटनेच्या निषेधार्थ गावातील सर्वपक्षीय कार्यकर्त्यांसह विविध संघटना व नागरिकांनी आंदोलन सुरू केले. त्यामुळे वेल्हे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तातडीने तपास सुरू केला. गावातील हर्षद कारके याच्या दुकानातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली असता, त्यात राजू भोसले हा ब्लेडने डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त लावलेले दोन्ही फ्लेक्स फाडत असल्याचे दिसले.


दरम्यान, हा प्रकार घडण्यापूर्वी रात्री साडेबाराच्या सुमारास विंझर गावातील कमानीसमोर नरेश विनोद गायकवाड, सुयश चद्रकांत गायकवाड, स्वराज उल्हास गायकवाड, विजय संजय गायकवाड आदी युवक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे फ्लेक्स लावत होते. त्या वेळी समाजकंटक राजू भोसले हा मोटारसायकलने तेथे आला. त्या वेळी त्याने, 'तुम्ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फ्लेक्स लावू नका. फ्लेक्स लावल्यावर बघा काय करतो ते मी, तो फाडून टाकणार', अशी दमदाटी करून जातिवाचक शिवीगाळ केली.

दरम्यान, फ्लेक्स फाडल्याच्या घटनेनंतर विंझर गावासह राजगड तोरणा भागात या प्रकारामुळे तीव्र संतापाची लाट पसरली आहे. पोलिसांनी तातडीने सखोल तपास करून समाजकंटकाला गजाआड केल्याने आता तणाव कमी झाला आहे. तरीदेखील गावात कायदा व शांतता राखण्यासाठी वेल्हे पोलिसांनी कडेकोट पोलिस बंदोबस्त तैनात केला आहे.

# नांदेड सिटीमध्ये सुरक्षा रक्षकांकडून महिलेसह मुलाला बेदम मारहाण

**पुणे । प्रतिनिधी**

नांदेड सिटीमध्ये असलेल्या 'मधुवंती' सोसायटीच्या सुरक्षा रक्षकांकडून महिलेसह तिच्या मुलाला बेदम मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. वाहनाला स्टिकर नाही, म्हणून फ्लॅट मालकाला शिवीगाळ करण्यात आली. त्यानंतर जाब विचारल्यावर आई व मुलाला मारहाण करण्यात आली.




याबाबत ४२ वर्षीय महिलेने नांदेडसिटी पोलिसात दिलेल्या फिर्यादीनुसार, नांदेड सिटी टाउनशिप सिक्युरिटीच्या अश्विनी नामक महिला, नेवरेकर नावाच्या व्यक्तीसह ८ ते १० सुरक्षा रक्षकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर महिलेसह मुलाने सुरक्षा रक्षकाला शिवीगाळ व मारहाण केली. याबाबत सुरक्षा रक्षकांनी दिलेल्या फिर्यादीनुसार दोघांवर अदखलपात्र गुन्हा दाखल झाला आहे. एकुण परस्पर विरोधी गुन्हे दाखल झाले आहेत. दोन्ही घटनांचे व्हिडीओ समाज माध्यमावर व्हायरल झाले आहेत. ही घटना ८ एप्रिल रोजी संध्याकाळी ४.३० वाजता घडला आहे. फिर्यादी महिला या त्यांच्या पती आणि २ मुलांसह १० वर्षांपासून मधुवंती सोसायटीमध्ये राहतात. फिर्यादीचे पती घटनेच्या वेळी सोसायटीच्या मुख्य प्रवेशद्वारावर आले.

मात्र, गाडीला स्टिकर नसल्याने सुरक्षा रक्षकांनी त्यांना थांबवुन ठेवले. तेव्हा फिर्यादी मुलासह सोसायटीचे रेसीडेन्स कार्ड घेवून तेथे गेल्या. तेथे पती व सुरक्षा रक्षकांमध्ये वाद सुरू होता. हा वाद सोडवण्यासाठी फिर्यादी व मुलगा पुढे गेला. त्यांच्याशीही वाद घालण्यात आले. ८ ते १० सुरक्षा रक्षकांनी त्या दोघांना बेदम मारहाण केली. त्यामुळे महिलेसह कुटुंबियांनी पोलीस ठाणे गाठले आणि तक्रार दाखल केली. तर महिला आणि मुलाने सुरक्षा रक्षकांना शिवीगाळ व मारहण केली. या प्रकरणी सुरक्षा रक्षकांनी दिलेल्या फिर्यादीनुसार दोघांवर अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे. नांदेड सिटी पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल भोस यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक प्रविण जाधव तपास करत आहेत.

# आमदार राहुल कुल यांच्या कार्यकर्त्यांना कानपिचक्या

**केडगाव । प्रतिनिधी**

दौंड भाजपकडून सदस्य नोंदणी अभियानात अपेक्षित उद्दिष्ट न गाठता आल्याने आमदार राहुल कुल यांनी खंत व्यक्त केली. राज्यातील वरिष्ठ नेत्यांपुढे मला मान खाली घालायला लावू नका, अशी विनंती त्यांनी कार्यकर्त्यांना केली आहे.




भाजपच्या स्थापना दिनानिमित्त चौफुला येथे भाजप कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित केला होता. या कार्यक्रमात बोलताना कुल यांनी ही खंत व्यक्त केली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे कार्यकर्त्यांशी संवाद साधला. तालुक्यात आतापर्यंत ३५ हजार सदस्य नोंदणी झाली आहे. या कार्यक्रमास नामदेव बारवकर, शेखर वडाणे, गंगाराम जगदाळे, राहुल शेवाळे, तानाजी दिवेकर, हरिश्चंद्र ठोंबरे, धनाजी शेळके, मोहन म्हेत्रे, बाजार समितीचे सभापती गणेश जगदाळे, पंढरीनाथ पासलकर, गोरख दिवेकर, अप्पासाहेब हंडाळ, अरुण भागवत, संजय इनामके, तुकाराम ताकवणे, राजकुमार मोटे आदी उपस्थित होते. ॲड. बापूराव भागवत यांनी सूत्रसंचालन केले. आमदार कुल म्हणाले, ''दौंड तालुक्यात भाजपचे संघटन मजबूत आहे. मात्र, सदस्य नोंदणीत ते प्रतिबिंबित होत नाही. संघटन मजबूत असल्याने पुणे जिल्ह्यात फक्त दौंडमध्ये भाजपला गेल्या विधानसभा निवडणुकीत यश मिळाले आहे. असे असताना सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट पूर्ण होत नाही, याचे वाईट वाटते. सदस्य नोंदणीत गती येण्यासाठी मलाच पाठपुरावा करावा लागत आहे. पक्ष नेतृत्वाने एखादा कार्यक्रम दिला तर त्यासाठी आपण वेळ का देऊ शकत नाही? काम करताना मी कुठे कमी पडत नाही. कार्यकर्त्यांकडून मला तीच अपेक्षा आहे. कार्यकर्त्यांकडून सदस्य नोंदणीचे अपेक्षित उद्दिष्ट साध्य होत नसल्याने या कामासाठी मी नाइलाजाने स्वतंत्र यंत्रणा सुरू करीत आहे. दौंडसाठी जो निधी येत आहे तो हवेवर येत नाही.''

# पवना कृषक सहकारी संस्थेवर भाजपाचे निर्विवाद वर्चस्व

**पवनानगर । प्रतिनिधी**

येथील पवना कृषक सहकारी संस्था ही परिसरातील ४० गावांची मुख्य सहकारी संस्था आहे.या संस्थेची २०२५-२०३० संचालक मंडळाची निवडणूक पार पडली. यामध्ये भाजप व राष्ट्रवादी यांच्यात सरळ लढत ठरली होती; परंतु मावळचे आमदार सुनिल शेळके यांनी निवडणूक बिनविरोध करण्याची सुचना दिल्यानंतर शेवटच्या दोन दिवसात दोन्ही पक्षाचे प्रमुख नेत्यांनी बसून बिनविरोध करत भाजपला ७ तर ६ जागा देण्याचे ठरविण्यात आले होते.



दरम्यान, अचानक अपक्ष उमेदवाराने २० मतदार आणून मतदान केले, त्यामुळे दोन्ही पॅनलच्या उमेदवार व नेत्यांची पळापळ झाली. शेवटच्या अर्ध्या तासात एकूण २३० मतदान झाले. परंतु अचानक गोंधळ उडाल्याने नक्की कोणत्या उमेदवारांना मतदान झाले आहे हे समजायला मार्ग नव्हता. अखेर मतदारांना भाजपाला स्पष्ट बहुमत दिले. अनेक वर्ष संस्थेवर भाजपाचे वर्चस्व आहे काल झालेल्या निवडणुकीत भाजपाचे ९ तर राष्ट्रवादी ४

# शिरूरमधील आठ कुटुंबांची ५५ लाखांची फसवणूक; ठेकेदार फरार

**शिरूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील मलठण, वरुडे व निमगाव दुडे येथील एकूण आठ कुटुंबांची घरबांधणीच्या नावाखाली तब्बल ५५ लाख ९१ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी शिरूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल झाली असून, संबंधित ठेकेदारांविरोधात कडक कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. फसवणूक करणारे नाशिक जिल्ह्यातील कंत्राटदार आहेत.




तक्रारदारांच्या माहितीनुसार वैजनाथ मोहिते, अजय पवार, नामदेव पवार आणि मोहन चव्हाण हे चौघे नाशिक जिल्ह्यातील नैताळे (ता. निफाड) गावचे रहिवासी आहेत. त्यांनी शिरूर तालुक्यातील गावांमध्ये आठ ते नऊ महिने वास्तव्य केले. या काळात त्यांनी गावकर्यांचा विश्वास संपादन करून घरबांधणीची कामे स्वीकारली.

सुरुवातीला काही घरांचे बांधकाम सुरू केले; मात्र काही महिन्यांनंतर ही कामे अर्धवट सोडून ते सर्व जण गावातून फरार झाले. त्यांनी रोख व ऑनलाइन स्वरूपात लाखो रुपयांची रक्कम स्वीकारली होती.

फसवणूक झालेल्या नागरिकांमध्ये भानुदास थोरात १३.५० लाख, खंडू शिंगाडे १३ लाख, म्हस्कू थोरात १२.१० लाख, अभिमन्यू बारहाते ८.५० लाख, मंगल पानगे ५ लाख, शंकर शिंदे २.५० लाख, मंगल शिंगाडे १.२० लाख रुपये याशिवाय मंगेश फुलसुंदर यांच्याकडून ६० हजारांची खडीक्रशर खरेदी केली असून त्यांचेही बिल दिलेले नाही.

फसवणुकीनंतर भानुदास थोरात हे कंत्राटदांच्या मूळ गावी नैताळे येथे गेले असता त्यांना धमकावण्यात आले आणि जिवे मारण्याची धमकी देण्यात आली. त्यामुळे या प्रकरणाची गंभीरता अधिक वाढली आहे.

दि. ३१ मार्च २०२५ रोजी शिरूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. तक्रारदारांनी अर्धवट बांधलेल्या घरांचे फोटो, बँक स्टेटमेंट व ऑनलाइन व्यवहारांचे पुरावे पोलिसांकडे सादर केले आहेत. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याने ४ एप्रिल रोजी पुन्हा एक अर्ज सादर करून कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

# सराईत गुंडावर एमपीडीए अंतर्गत कारवाई

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर शहरात सराफा दुकानावर फायरिंग करून दहशत माजवणाऱ्या सराईत गुंड शरद बन्सी मल्लाव (वय २५, रा. काची आळी, शिरूर) याच्यावर पुणे ग्रामीण पोलिसांनी महाराष्ट्र प्रतिबंधक धोकादायक कृत्ये कायदा अंतर्गत कठोर कारवाई केली. ही कारवाई २०२५ मधील पुणे ग्रामीण विभागातील पहिलीच धडक कारवाई ठरली आहे.




शरद मल्लाव हा शिरूर पोलीस ठाण्याच्या रेकॉर्डवरील सक्रिय गुन्हेगार आहे. त्याच्याविरुद्ध २०२१ ते २०२४ दरम्यान शिरूर, रांजणगाव आणि पाली (जि. रायगड) पोलीस ठाण्यांत ७ गंभीर गुन्हे दाखल आहेत. यात खूनाचा प्रयत्न, जबरी चोरी, दरोड्याचा प्रयत्न, प्राणघातक हल्ले, मालमत्तेचे नुकसान आणि दमदाटी यांचा समावेश आहे.

यापूर्वी शरदला दोनदा जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले होते, पण त्याच्या गुन्हेगारी वृत्तीत बदल झाला नाही. हद्दपारीदरम्यानही त्याने गुन्हे सुरूच ठेवले. अखेरीस, पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांच्या शिफारशीवरून आणि जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या आदेशानुसार त्याच्यावर चझऊ- अंतर्गत स्थानबद्धतेची कारवाई झाली. ९ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता त्याला काची आळी येथून ताब्यात घेऊन अकोला मध्यवर्ती कारागृहात पाठवण्यात आले.

या कारवाईत पोलीस निरीक्षक संदेश केंजळे, उपनिरीक्षक शुभम चव्हाण, स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक फौजदार महेश बनकर, पोलीस हवालदार मंगेश थिगळे, परशराम सांगळे, नाथसाहेब जगताप, नितेश थोरात, अजय पाटील, विजय शिंदे, निखील रावडे, रविंद्र आव्हाड, निरज पिसाळ यांचा सहभाग होता. २०२४-२५ मध्ये शिरूर पोलिसांनी ४ सराईत गुंडांवर अशी कारवाई केली आहे. पुढेही अशा कठोर कारवाया सुरू राहतील, असे पोलीस निरीक्षक केंजळे यांनी सांगितले.